# ११. यज्ञीय हिंसा

*यज्ञविधीचे तात्पर्य अहिंसेत*

येथील दक्षिणामूर्तीच्या मंदिरात पशुयज्ञाचे शास्त्रीयरीत्या समर्थन करण्याकरीता वे. शा. सं. विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले यांनी जो प्रवचन सप्ताह केला होता त्याचा गोषवारा 'दै.महाराष्ट्रात' प्रसिद्ध करण्याचे ठरविले असून ता. २४-३-३५ च्या अंकात त्यांचा पहिला लेख आला आहे. पूर्वेतिहासानुसार माझा ह्या सप्ताहाशी निमित्त ह्या दृष्टीने संबंध असून येथील निषेधसभेत आकस्मिक झालेले माझे भाषण ऐकून काही ब्रह्मवृंद मजवर फारच रुष्ट झालेला आहे. तेव्हा येथील ब्रह्मवृंदापुढे माझे म्हणणे मला मांडणे भाग असल्यामुळे शास्त्रीबोवांच्या प्रवचनांचा विचार करून आपले ब्रह्मवृंदांस कळविण्याबद्दल त्यांची आज्ञा मागतो. त्याचप्रमाणे ब्रह्मवृंदांस नम्रपणे हेही विदित करू इच्छितो की, **'नाहमस्मि ब्राह्मणनास्तिकः । न यज्ञं च विनिन्दामि । यज्ञवित्तु सुदुर्लभः' ।**'मी नास्तिक नाही व मी यज्ञाची निंदाही करीत नाही. यज्ञाचा खरा अर्थ जाणणारे दुर्लभ आहेत;'
**'नमो ब्राह्मणयज्ञाय ये च यज्ञविदो जनाः'**

ब्राह्मणयज्ञाला व यज्ञाचा खरा अर्थ जाणणाऱ्यांना माझे शतशः प्रणाम आहेत. ब्रह्मवृंदाला कोणत्याही रीतीने दुखविण्याची माझी इच्छा नाही; पण त्यांनाही शास्त्राच्या विरुद्ध बोलणाऱ्या विषयीचे दुःख वाटले पाहिजे. शास्त्रास व प्राचीन आचार्यांच्या मतास धरून बोलणाऱ्याचे वाईट वाटू नये; म्हणून मी जो शास्त्रार्थ करीत आहे तो पूर्वीच्या आचार्यांच्या व शास्त्रांच्या विरुद्ध आहे काय? एवढेच त्यांनी अंतःकरणात काहीएक पूर्वग्रह न ठेवता पहावे अशी त्यांना मी विनंती करतो. प्रवचनद्वारा आपले म्हणणे त्यांच्यापुढे मांडण्याची आपली इच्छा मी कित्येक सद्‌गृहस्थांपाशी बोलून दाखविली होती; पण त्याला कोणत्या कारणाने कोण जाणे चालन मिळाले नाही. असो.

शास्त्रीबोवांच्या लेखांचा सारांश असा आहे की, वेदाने सांगितलेला धर्म तो वैदिक. वेद म्हणजे ऋग्वेदादी संहिता, उपनिषद व आरण्यके इत्यादी ब्राह्मणभाग मिळून होय. या वैदिक धर्माचे श्रौत व स्मार्त असे दोन भाग आहेत. पुराणोक्त धर्म नवीन असून तो स्त्रीशूद्राकरिता सांगितलेला आहे. वैदिक धर्माचे



[illegible] यज्ञ. अग्नी ही आर्यांची प्रधान देवता. विष्णू म्हणजे सूर्यच. वेद अपौरुषेय आहेत. यातून पुढील मुद्दे विचार करण्याजोगे आहेत.

१ वैदिक धर्माचे दोन भाग म्हणजे श्रौत-स्मार्त हे आहेत काय?

२ वैदिक धर्मात पुराणोक्त धर्मांचा समावेश होत नाही काय?

३ पुराणोक्त धर्म स्त्रीशूद्राकरिताच आहे काय?

४ वैदिक यज्ञ म्हणजे ज्यात अग्नीमध्ये द्रव्याच्या आहुती पडतात व जो यजमान, ऋत्विक् ह्यांच्या सहाय्याने निष्पन्न होतो तोच काय?

५ आर्यांची मुख्य देवता अग्निच काय?

**मुद्दा १ ला :-** वैदिकधर्माचे मुख्य भेद श्रौत-स्मार्त हे नसून मनूने सांगितल्याप्रमाणे **'प्रवृत्तं च निवृत्तं च द्विविधं कर्म वैदिकम्'** *प्रवृत्तकर्म म्हणजे ऐहिक व पारलौकिक विषयसुख प्राप्त करून देणारे व *निवृत्तकर्म म्हणजे आत्मप्राप्ती करून देणारे असे मुख्य दोन प्रकारचे कर्म आहे.

**'आचारः परमो धर्मः श्रुत्युक्त स्मार्त एव च'**

या श्लोकामध्ये मनूने जो दोन प्रकारचा आचारधर्म आहे म्हणून म्हटले आहे त्याचा अर्थ असा आहे की, संपूर्ण श्रौत व स्मार्तधर्म वेदोदितच आहे; ज्या वेदशाखा उच्छिन्न झाल्या म्हणजे ज्या आचारधर्माचे विधान करणारी श्रुती आज उपलब्ध नाही, तो आचारधर्म स्मृतीमध्ये ऋषींनी सांगून ठेवला, म्हणून स्मार्त आचारही श्रुत्युक्तच होय. तेव्हा श्रौत व स्मार्त ह्या दोन धर्मांतील फरक म्हणजे -

एक शब्दतः व अर्थतः अपौरुषेय असून

दुसरा अपौरुषेय असून शब्दतः पौरुषेय आहे;

म्हणून वैदिकधर्माचे अर्थतः श्रौत व स्मार्त असे भेद नसून प्रवृत्त व निवृत्त असे भाग आहेत. भगवान् आचार्यही गीताभाष्याच्या उपोद्घातात -

**'द्विविधो हि वेदोक्तो धर्मः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च ।'**

प्रवृत्तिलक्षण व निवृत्तिलक्षण असा दोन प्रकारचा वैदिकधर्म आहे. असे म्हणतात.

**मुद्दा २ रा :-** पुराणोक्त धर्म वैदिक नाही हे शास्त्रीबोवांचे विधान अत्यंत अवैदिक आहे. इंग्रजांचे राज्य सुरू झाल्यापासून आर्यग्रंथाकडे पाश्चात्यांच्या ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याची जी खोड आमच्या आधुनिक विद्वानांना लागली त्याचीच झळ आमच्या वैदिक शास्त्रीबोवांनाही लागलेली दिसते. पुराणधर्म नवीन

व अवैदिक आहे असा शेरा इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वीच्या काळी होऊन गेलेल्या कोणत्याही वैदिक विद्वानाने मारलेला नाही. उलट ब्रह्मसूत्रातील देवताधिकरणात,

**‘तस्मात्समूलमितिहासपुराणम्’** (**शांकरभाष्य १-३-३३**)

म्हणजे इतिहास पुराणे देखील साधार; त्यांना वेदाचा आधार आहे, असे म्हणून भगवान् आचार्यांनी त्यांचे प्रामाण्य सिद्ध केले आहे.

**‘स्मरन्ति च’॥१४॥ ‘अपि च सप्त’॥१५॥**

**‘स्मर्यतेऽपि च लोके’॥१९॥** (**ब्र.सू. अ.३**)

इत्यादी सूत्रात ब्रह्मसूत्रकारांनीही पुराणेतिहासातील सप्तनरकादिकांचे वर्णन वगैरे पदार्थांचा अंगीकार करून त्यांना प्रामाण्य दिले. ब्रह्मसूत्रभाष्य व गीताभाष्य यात विष्णुपुराण, महाभारत इत्यादी ग्रंथातील श्लोक प्रमाणार्थ घेतलेले आहेत. ज्या महाभारतासारख्या ग्रंथातील गीतोपदेशाचा भाग भगवान् आचार्यांनी वेदाच्या तोडीला बसवून प्रस्थानत्रयीत त्याचा समावेश केला

(गीताभाष्य.अ.२श्लो.२८,अ.३ आरंभीचे भाष्य,अ.३श्लो.३६,अ.६श्लो.३,अ.१२श्लो.१९इत्यादि)

व ज्या भारतकारांना व पुराणांचे विभाग करणाऱ्यांना भगवान शंकराचार्य **‘वेदव्याससर्वज्ञो भगवान्’** म्हणून उल्लेखितात त्या भगवान् व्यासांनी केलेल्या पुराणेतिहासांना आमचे शास्त्रीबोवा अप्रमाण ठरवितात याला काय म्हणावे, हे मला समजत नाही. श्राद्धामध्ये पितरांना,

**‘स्वाध्यायं श्रावयेत् पित्र्ये धर्मशास्त्राणि चैव हि ।**
**आख्यानानीतिहासांश्च पुराणान्यखिलानि च ॥’**

धर्मशास्त्रे, इतिहास व पुराणातील आख्याने ऐकवावी असे मनूने व इतर स्मृतिकारांनीही म्हटले आहे. व्यासस्मृतीमध्ये पुराणांचे प्रामाण्य मानले आहे व त्यांचे अध्ययनही विहित केले आहे. छांदोग्य उपनिषदामध्ये **‘इतिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदम्’** (छां.उ.७-१-२) म्हणजे इतिहास-पुराण पांचवा वेद होय असे सांगितले असून ‘इतिहास’ पदाने भगवान् आचार्यांनी आपल्या भाष्यात ‘भारत’ घेतले आहे. ऋग्वेदावरील भाष्याच्या उपोद्घातात वेदांचा अर्थ करण्याकरिता पुराणेतिहासाचे प्रामाण्य सायणाचार्यांनीही मानले आहे व -

**‘पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्रांगमिश्रिताः ।**



**वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश ॥’** (**याज्ञ. स्मृ. १-३**)

हे याज्ञल्क्यांचे वचन व -

**‘इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।**
**बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामय प्रहरिष्यति ।’**

हे स्मृतिवचन प्रमाण दिले आहे. सूतसंहितेच्या टीकेत विद्यारण्य म्हणतात,

**‘‘वेदे हि द्वौ भागौ कर्मभागो ज्ञानभागश्चेति ।**
**आद्यस्यार्थः स्मृतिमुखेन व्याख्यातः ।**
**द्वितीयस्यतु विष्णुना व्यासरूपेणावतीर्य पुराणमुखेनेति स्मृतिपुराणानां वेदमूलता’’**

**(सूतसंहिता शिव म. खंड अ.१ श्लोक ४१)**

कर्म व ज्ञान असे वेदाचे दोन भाग असून स्मृतीत वेदाच्या कर्मभागाचा व पुराणात वेदाच्या ज्ञानभागाचा विस्तार केला आहे, म्हणून स्मृती व पुराणे वेदमूलकच आहेत. मनूने सर्व वेद, वेदाला जाणणाऱ्यांची स्मृती व साधूंचा आचारधर्म हे सर्व धर्माचे मूळ आहेत असे मानले आहे (मनु.अ.२-६) आचार सांगणारी पुराणे भगवान् व्यासांनी लिहिली अशी लोकप्रसिद्धीही आहे. व

**‘लोकप्रसिद्धिरपि न सति संभवे निरालंबनाऽध्यवसातुं युक्ता’**

(ब्र. सू. शां. भा. १-३-३३)

लोकात प्रसिद्ध असलेली गोष्ट संभवनीय असताना विनाकारण ती गोष्ट तशी घडली नाही हे म्हणणे योग्य नाही, असे आचार्य म्हणतात. पुन्हा पुराणेतिहासात वेदविरुद्ध काहीएक नाही असे असताना पुराणेतिहासांचे अप्रामाण्य कोणत्या प्रमाणाच्या बळावर ठरवायचे? शास्त्रीबोवांनी जर एखादे वेदोक्त प्रकरण सांगितले तर ते देखील स्वतः वेदास धरून असल्यामुळे अवैदिक किंवा अप्रमाण म्हणणार नाहीत. तेव्हा श्रुतिस्मृतीचे आचारविचार सांगणारे पुराण ग्रंथ, अप्रमाण व अवैदिक कसे ठरू शकतात? ऐतिहासिक दृष्टीनेही पाहता वेदानंतर झालेल्या स्मृत्या जर वैदिक व प्रमाण ठरतात तर त्याच आधाराने पुराणे कां प्रमाण ठरू नयेत?

### *पुराणोक्त धर्म कोणासाठी ?*

**मुद्दा ३ रा :-** आता पुराणोक्त धर्म स्त्रीशूद्राकरिताच आहेत काय? या

तिसऱ्या मुद्दाचा विचार करू.

स्त्रीशूद्रद्विजबंधूकरिता भारत रचले असे जरी भागवतात म्हटले असले तरी त्यात केवळ स्त्रीशूद्रांचेच धर्म सांगितले आहेत असे नसून श्रुतिस्मृतीतून जे ब्राह्मणादी चार वर्णाचे धर्म सांगितले आहेत तेच धर्म, पुराणातूनही दिले असून आणखी काही विशेषधर्मांचे निरूपण आले आहे. स्मृत्युक्त धर्म जर वेदमूलक आहे तर त्याच स्मृत्युक्त धर्माचा अनुवाद करणारा पुराणभागही वैदिक व चारही वर्णांना प्रमाण ठरतो. पुराणातील उपासनाधर्म सांगणाऱ्या भागाला नृसिंहतापनीय, रामतापनीय, गोपालतापनीय इत्यादी उपनिषद्रूप वेदभाग मूल असल्यामुळे तोही वैदिक व ब्राह्मणादी वर्णांना विहीत आहे. त्यातील हरिनाममाहात्म्य सांगणारा जो भाग, त्याला तर ऋग्वेदाचाच आधार आहे. ऋग्वेदात -

**'विष्णोर्नुकं वीर्याणि प्रवोच'**

इत्यादी ऋचेत भगवान विष्णूचे माहात्म्य सांगितले असून, **'तमुस्तोतार'** इत्यादी ऋचेत नामसंकीर्तनाचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे. **'मर्त्या अमर्त्यस्य ते भूरि नाम मनामहे'** ही दुसरीही ऋचा नाममाहात्म्य सांगते. बहुतेक सर्वच श्रौतस्मार्तकार्यात न्यूनपूर्ण होण्याकरिता व संध्योपासनेत नामस्मरणाचा विधी सांगितला आहे व सर्व वैदिक धर्मानुयायी तसे नामस्मरण करतातही; तेव्हा पौराणिकधर्म अवैदिक व स्त्रीशूद्रादिकांकरिता विहीत आहे असे विधान निर्मूल नाही काय?

भगवान् आचार्यांनी अपशूद्राधिकरणात -

**''श्रावयेत् चतुरो वर्णान् इति चेतिहासपुराणाधिगमे चातुर्वर्ण्यस्याधिकारस्मरणात्''**

**(ब्र.सू.शां.भा.१-३-३८)**

पुराणोक्त धर्माचा चारी वर्णांना अधिकार आहे असे स्पष्ट म्हटले आहे.

*वैदिक धर्माची व्याप्ती*

**मुद्दा ४ था :-** यापुढे वैदिक धर्म म्हणजे यज्ञ. हा चवथा मुद्दा घेवू.

यात प्रथम आपल्याला मुख्यतः 'वैदिक' ह्या शब्दाचा अर्थ काय? हे पाहिले पाहिजे. वैदिक म्हणजे वेदप्रतिपादित. 'वेद' ह्या शब्दाने मंत्र व आठ प्रकारचे ब्राह्मणग्रंथ घेतले जातात. या अष्टविध ब्राह्मणात उपनिषदे, आरण्यके वगैरे येतात, म्हणून ''वैदिक'' म्हणजे ''मंत्र ब्राह्मणरूप अपौरुषेय ग्रंथांनी सांगितलेला'' असा अर्थ होतो. पण आज जेवढा वेद उपलब्ध आहे तेवढाच तो आहे असे नाही, पुष्कळ



शाखा लोप पावल्या असून **'अनन्ता वै वेदाः'** वेद अनंत आहेत, असे तैत्तिरीय ब्राह्मणश्रुति आहे. वरील वेदग्रंथाशिवाय मनू, व्यास इत्यादी महात्म्यांनीही स्मृतिपुराणादी ग्रंथ केले असून त्यातून चारही वर्णांचे धर्म सांगितले आहेत, तेव्हा या पौरुषेय ग्रंथातील धर्म वैदिक आहेत किंवा नाही हा प्रश्न उत्पन्न होतो. व पूर्वमीमांसेतील -

**'अपि वा कर्तुसामान्यात् प्रमाणमनुमानं स्यात्' (पूर्वमीमांसा अ.१ पा.३ सू.२)**

या सूत्राने व्यास, मनू इत्यादिकांचे पौरुषेय ग्रंथही वेदमूलकच आहेत. म्हणजे त्यात वेदातीलच (अर्थात लोपलेले ) धर्म दिले आहेत असे ठरविले आहे. कोणी ह्या सूत्रात नुसत्या स्मृतिग्रंथाचेच प्रामाण्य ठरविले आहे, असे म्हणतील. पण 'स्मृती' हा शब्द वेदातिरीक्त पौरुषेय ग्रंथांना लावलेला असल्यामुळे त्यांचे म्हणणे निर्मूल आहे. यावरही कोणी दुराग्रह केल्यास **'तुष्यतु दुर्जनः'** या न्यायाने त्यांच्याशी वाद न करता त्यांना आम्ही असे उत्तर देतो की, पूर्वमीमांसेत या सूत्राने जसे स्मृतीचे वेदमूलकत्व ठरविले आहे व छांदोग्यातील अ. ७ मध्ये पुराणादिकांना पांचवा वेद म्हटले असून आचार्यांनी 'इतिहास' याचा अर्थ 'भारत' असा स्पष्ट केला आहे. याप्रमाणे स्मृतिपुराणे वेदमूलकच असल्यामुळे वैदिकधर्म म्हणजे वेदोपनिषदे, स्मृतिपुराणे या ग्रंथांतून सांगितलेला धर्म असा अर्थ होतो व सर्व वैदिक लोक आजपर्यंत असेच मानीत आले.

*सूर्य म्हणजे विष्णू नव्हे*

यावरून वैदिक धर्म म्हणजे ज्यात सूर्यादिदेवतांचे यजन केले जाते तो, देवयज्ञ एवढाच अर्थ नाही, हे ओघानेच येते. गीतेतही यज्ञासह प्रजा निर्माण करणाऱ्या प्रजापतीने ज्या यज्ञात काष्ठमंथन करून अग्नी उत्पन्न करतात व देवतांना हविर्भाग देतात तो देवयज्ञच एक निर्माण केला नसून त्याबरोबरच स्वाध्याय यज्ञ, योगयज्ञ, ज्ञानयज्ञ इत्यादी,

**'एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे' (गी. अ. ४-३२)**

पुष्कळ यज्ञ उत्पन्न केले असे म्हटले आहे. **'वेदद्वारेण गम्यमाना'** असे आपल्या भाष्यात आचार्य म्हणतात. हे सर्व यज्ञ वैदिकच आहेत. उपनिषच्छास्त्राप्रमाणे जगत् हे प्रथम नव्यानेच उत्पन्न होत नसल्यामुळे प्रत्येक सृष्टीत मागील प्रयत्नानुसार उन्नत

झालेले प्रवृत्ती व निवृत्ती अशा दोन्ही धर्मांचे अधिकारी उत्पन्न होत असतातच व त्यांच्याकरिता असे निरनिराळे यज्ञ उत्पन्न होणेही आवश्यकच आहे. सायणाचार्यांनी **'यज्ञेन यज्ञमयजंत देवाः'** या ऋचेवरील भाष्यात यज्ञाचे तीन प्रकार सांगितले आहेत. (१) काष्ठमंथन करून काढलेल्या अग्नीत आहुती देणे हा एक यज्ञ, (२) अग्नीने अग्नीचे पूजन करणे हा दुसरा व (३) ज्ञानाने विष्णूचे पूजन करणे हा तिसरा यज्ञ होय. (४) पुरुषसूक्तात तर सायणाचार्य म्हणतात. 'प्रथम जो देवादिकांनी यज्ञ केला तो मानसिकच होता व हाच धर्म मुख्य होता.' या सर्व गोष्टींचा विचार करता असे दिसून येते की, (५) श्रुति-स्मृति-पुराणानी सांगितलेल्या स्वधर्माने **'यज्ञो वै विष्णुः'** या श्रुत्युनुसार भगवंताचे पूजन करणे हाच यज्ञ होय.**'यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र'** (गी. अ ३-९) या गीताश्लोकावरील भाष्यात आचार्य म्हणतात,

**'यज्ञो वै विष्णुरिति श्रुतेः यज्ञः ईश्वरस्तदर्थं यत्क्रियते तत् यज्ञार्थं कर्म'**

यज्ञ म्हणजे विष्णू, म्हणून त्याच्या प्रीत्यर्थ जे केले जाते ते यज्ञार्थ. यज्ञ कर्मच होय. विष्णू हा शब्द मुख्यतः ईश्वरवाची आहे व याच अर्थाने तो ऋग्वेदात आला आहे. सायणाचार्यांनीही **'विष्णुः परमेश्वरः'** असा अर्थ दिला आहे. परमेश्वराची कोठे उत्पत्ती सांगितली नाही. पण सूर्याची उत्पत्ती सांगितली आहे; म्हणून सूर्याची जेथे ईश्वररत्वाने स्तुती केली आहे, तेथे 'विष्णू' हा शब्द सूर्याला लावण्यात आला किंवा प्रकाशक धर्माच्या साम्यावरून विष्णुलाही सूर्य म्हटले, म्हणून सूर्य हाच विष्णू असे मुळीच म्हणता येत नाही. एकाच देवतेला निरनिराळी रूपे धरता येतात म्हणून देवताधिकरणात सांगितले आहे. विष्णू तर सर्वव्यापी व सर्वसमर्थ असल्यामुळे त्याला सूर्य म्हटले तरी चालते किंवा दुसरे नांव दिले तरी चालते; पण सूर्य म्हणजेच विष्णु हा भ्रम होय.

*अग्न्यादी देवता कोणासाठी?*

**मुद्दा ५ वा :-** आता आर्यांची मुख्य देवता अग्नी या मुद्याचा विचार करू.

उपनिषदांच्या दृष्टीने पाहता परब्रह्म मुख्य वस्तू असून अग्न्यादिक तिची मायिक व नाशिवंत रूपे आहेत, तेव्हा मुख्य परमात्म्याला सोडून आर्यांनी अग्नीला म्हणजे परमेश्वराच्या मायिक रूपाला मुख्य मानणे शक्य नाही. ऋग्वेदाच्या उपोद्घातात सायणाचार्य म्हणतात,

**'तस्माद्यज्ञात्सर्वहुतऋचः सामानि जज्ञिरे'**

**सहस्त्रशीर्षा पुरुष इत्युक्तत्वात् परमेश्वराद्यज्ञाद्यजनीयात् पूजनीयात् सर्वहुतः सर्वैर्हूयमानात् ।**

**यद्यपीन्द्रादयस्तत्र तत्र हूयन्ते तथापि परमेश्वरस्यैवेन्द्रादिरूपेणावस्थानादविरोधः।**

**तथा च मंत्रवर्णः ।**

**इद्रं मित्रं वरूणमग्निमाहुरथो दिव्यः ससुपर्णो गरुत्मान् ।**

**एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति - अग्निं यमं मातरिश्वानमाहुरिति ।**

**वाजसनेयिनश्चामनन्ति ... तस्मात्सर्वैरपि परमेश्वर एव हूयते ।**

ह्याचा भावार्थ असा आहे की, परमेश्वरापासून सर्व वेद निर्माण झाले असून इंद्रादी देवतांच्या रूपाने परमेश्वराचेच यजन होत असते; म्हणून परमेश्वर हीच आर्यांची मुख्य देवता होय. किंवा प्रवृत्तिमार्गात अग्नी व सूर्य याच मुख्य देवता आहेत असे जरी मानले तरी प्रवृत्तिमार्गाबरोबरच निवृत्तिमार्गही अस्तित्वात येत असल्यामुळे अग्निसूर्यांना मुख्य मानणाऱ्या आर्यांबरोबर अग्निसूर्यांच्या द्वारा व स्वतंत्रपणे परमेश्वराचे पूजन करणारेही आर्य तेव्हा राहतातच. म्हणून खरी मुख्य देवता एकच आहे. पण परमात्म्याची ज्यांना ओळख नाही व प्राप्तीची इच्छा नाही त्यांच्याकरता अग्न्यादी देवता आहेत.

विद्याभूषण घुलेशास्त्री यांनी ता. ३१-३-१९३५ च्या महाराष्ट्रात जो दुसरा लेखांक दिला आहे त्यात यज्ञांची माहिती असल्यामुळे त्यावर लिहिण्यासारखे काहीच नाही. पुढे ता. ७-४-१९३५ च्या अंकात त्यांचा तिसरा लेख आला आहे त्याची आता समीक्षा करू.

*वाद कसा मिटेल?*

या लेखात ''यज्ञीय हिंसा आवश्यक म्हणणारा एक पक्ष व ती अनावश्यक म्हणणारा दुसरा पक्ष, असे दोन पक्ष देवून आपले पुराणादी सर्व धर्मग्रंथ प्रक्षेप, मताभिमान, अर्थान्तर, विरोध, अर्थवाद, रूपके यांनी भरलेले व त्यातही संस्कृत भाषा लवचिक असल्यामुळे वाद मिटणे कठीण आहे,'' असे ते म्हणतात. ''तरी पण या दोन पक्षात कोणतातरी एकच पक्ष खरा असावा हे निर्विवाद आहे व मी जरी ते ठरविले तरी वाद मिटणे अशक्य'' असे म्हणून आपलाच सत्पक्ष आहे, हा दंश मात्र त्यांनी दाखविला.

वेदशास्त्रांचे संस्कृत भाषेच्या लवचिकपणामुळे जर अनेक अर्थ होण्याचा संभव आहे, तर अशा बिकट परिस्थितीत आपला पक्ष खरा आहे असा दंश तरी कसा दाखविता येतो ?

संस्कृत व प्राकृत भाषेतील शब्दांना अनेक म्हणजे अनियमित अर्थ नाहीत. एखाद्या शब्दाचे एकापेक्षा अधिक अर्थ आहेत, पण तेही मर्यादितच आहेत. असे मर्यादित अर्थही सर्व ठिकाणी लागू होत नाहीत. लागू झाले असते तर व्यवहारात घोटाळाच झाला असता. पण माणसे शब्दाने व्यवहार करताना व शास्त्रे समजताना दिसली म्हणजे ज्या एखाद्या शब्दाला एकापेक्षा अधिक अर्थ असतील त्या शब्दाचा वाक्यात उपयोग झाला असता, अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य, वाक्य उच्चारण्याची इच्छा व त्या शब्दाच्या वाक्यातील इतर शब्दादिकांशी अथवा इतर जवळच्या वाक्यादिकांशी संबंध पाहता, जो अर्थ जुळेल तोच अर्थ करताना श्रुतिलिंगादी किंवा उपक्रमोपसंहारादी प्रमाणांचा उपयोग करण्यास सांगितले आहे.

''शब्दांचा अर्थ करण्यात काहीच निश्चित प्रमाणपद्धती नाही व संस्कृत भाषेच्या लवचिकपणामुळे वादी निरनिराळे अर्थ करितात'' - असा आक्षेप घेतल्यास शास्त्रीबोवाही स्वतःला त्यातून आपणास सोडवू शकत नाहीत. किंबहुना जैमिनी, व्यास इत्यादी सर्व ग्रंथकारावर त्याचा शिंतोडा उडल्याखेरीज राहत नाही, तेव्हा वाक्यार्थनिर्णायक पद्धतीस धरून जे अर्थ असतील ते प्रमाण व बाकीचे अर्थाच अप्रमाण ठरतात, हे जाणून निर्णायकपद्धतीचा स्वीकार केल्यास वाद मिटणे शक्य आहे.

*शास्त्रीबोवाच्या विधानातील विसंगती*

**'जन्माद्यस्य यतः'** इत्यादी श्लोकांचे जरी पुष्कळ अर्थ कोणी केले असले तरी प्रत्येक ग्रंथाचे विषय, प्रयोजन, अधिकारी व संबंध हे जे चार अनुबंध असतात त्यावरून पाहता त्याचा एक मुख्यार्थ असून बाकीचे गौणार्थ किंवा गमतीचे अर्थ होत, असे प्रत्येक तज्ज्ञ मानील. भाषेच्या लवचिकपणामुळे निराळे अर्थ कसे होतात याचे उदाहरण देताना शास्त्रीबोवांनी म्हटले,

**'सर्व धर्मान् परित्यज्य' । व 'विद्या नसे ज्या पुरुषास काही'**

या दोन श्लोकांचे कित्येकांनी कसे भलतेच निराळे अर्थ केले आहेत हे सांगितले. पण हे सांगताना देखील त्यांचे मुख्य अर्थ निराळेच आहेत असे स्वतः शास्त्रीबोवांना जसे वाटते तसेच सर्व जाणत्या पुरुषांना वाटते. ज्यांना भाषेचे ज्ञान नाही अशा ख्रिस्तांची उदाहरणे देऊन काय फायदा? भाषेच्या लवचिकपणाचा फायदा घेऊन द्वैती अद्वैती इत्यादी पंथ निर्माण झालेत असे म्हणताना दोघांनी आपआपल्यापरी शब्दांचे अर्थ केले असा दोघांवरही आरोप करता येईल किंवा त्यापैकी एकानेच स्वमतानुसार भाषेचा अर्थ ओढून काढला असे म्हणता येईल. पहिल्यापक्षी दोघेही श्रुतितात्पर्याला जाणणारे ठरतात व मग दोघांपैकी कोणता तरी एक पक्ष खरा व दुसरा खोटा असला पाहिजे हे शास्त्रीबोवांचे म्हणणे कसे संभवते? दुसऱ्यापक्षी दोघांनाही एका आरोपात कसे गुरफटता येईल?

*मीमांसेच्या दृष्टीने खंडन*

शास्त्रीबोवा म्हणतात :- ''वाद न मिटण्याचे दुसरे कारण वेदासुद्धा सर्व धर्मग्रंथांचा पुष्कळसा भाग अर्थवादवाक्यांनी भरलेला आहे.''

अर्थवाद म्हणजे 'अनर्थक स्तुति व अनर्थक निंदा'. संपूर्ण वेद कर्मपर आहेत असा पूर्वमीमांसेचा सिद्धान्त असल्यामुळे पूर्वमीमांसा शास्त्रात जरी अर्थवाद अनर्थक आहे (म्हणजे स्वतः त्या वाक्यातील पदांचा पदानुसार स्वतंत्र अर्थ नाही) तरी त्या अर्थवाद वाक्यांना प्रमाण ठरविण्याकरिता ती वाक्ये विधीची स्तुती किंवा निंदा करणारी ठरवून व विधिवाक्याशी संबद्ध करून पूर्वमीमांसेत त्यांचे प्रामाण्य सिद्ध केले आहे. उत्तरमीमांसेत कर्मकाण्डातील एक 'गुणभूत' अर्थवाद सोडून बाकीचे दोन, अनुवाद व भूतार्थवाद सार्थ मानले आहेत. म्हणजे एकंदर तीन अर्थवाद आहेत. **गुणवाद, अनुवाद व भूतार्थवाद.**

१- प्रत्यक्षादि प्रमाणांशी विरुद्ध असणारा गुणवाद म्हटला जातो. जसे, **'यजमानः प्रस्तर',** यजमान दगड नाही हे आपण प्रत्यक्ष पाहतो, या आपल्या प्रत्यक्षाच्या विरुद्ध हा अर्थवाद आपल्याला 'यजमान दगड आहे' असे सांगतो; म्हणून यातील शब्दांना शब्दानुसार काही अर्थ नाही.

२- अनुवाद हा आपण ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहतो त्यांना सांगणारा असतो. जसे **'अग्निर्हिमस्य भेषजम्'**, विस्तवाने थंडी जाते हे अर्थवादवाक्य वरील गुणवादासारखे स्वार्थरहित नाही; तर त्याला पदानुसार अर्थ असून तो अर्थ आपल्या अनुभवाला येतो.

३- तिसरा भूतार्थवाद, जसे, **'श्वेतकेतुर्आरुणेय आस'**, अरुणीऋषींचा श्वेतकेतु नांवाचा एक मुलगा होता. हा अर्थवाद इतिहास सांगणारा आहे म्हणून याला ऐतिहासिक प्रामाण्य आहे. अर्थवाद अनर्थक आहे हे पूर्वमीमांसेतील म्हणणे घेऊन उत्तरमीमांसेचा विचार न करता शास्त्राने सांगितलेली फलश्रुतीही शास्त्रीबोवांनी खोटी ठरवून टाकली. शास्त्रीबोवा म्हणतात,

**'प्रातःकाले शिवं दृष्ट्वा' किंवा 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी'**
**किंवा 'कुम्भीपाकेषु पच्यन्ते'**

यातील अक्षरार्थ खरा नाही. शिवदर्शन घ्यावे व देवाचे द्वारी क्षणभर उभे रहावे एवढाच त्यात ग्राह्यांश आहे. शास्त्रीबोवांच्या विधानानुसार पाहिले म्हणजे – पूर्वमीमांसेतल सर्व यज्ञकर्मांची स्वर्ग ही फलश्रुती, सर्व निषिद्ध कर्मांची नरकरूप फलश्रुती व सर्व प्रायश्चित कर्मांची दोषनिवृत्तिद्वारा नरकरूप अनिष्ट फलनिवारक फलश्रुती – ह्या सर्व व्यर्थ होऊन स्वर्ग नाही, नरक नाही हे सर्व निरर्थक शब्द आहेत असे म्हणण्याची पाळी येते; व लेखाच्या आरंभी ज्या नास्तिकांचा उल्लेख करून मला त्यांच्याशी बोलावयाचे नाही असे शास्त्रीबोवा म्हणतात त्याच नास्तिकांच्या मतांचा अनुवाद त्यांचेकडून होऊ पाहतो.

पूर्वमीमांसेच्या दृष्टीनेही शास्त्रीबोवांचे हे विधान योग्य नाही; कारण मीमांसेच्या दृष्टीने प्रत्येक विधीला साध्यांश पाहिजे असतो. म्हणजे शिवदर्शन कशाकरता घ्यावयाचे व देवाचे द्वारी कशाकरिता उभे राहावयाचे हा प्रश्न सोडवावा लागतो. पण शास्त्रीबोवांनी फलश्रुतीला अर्थवाद म्हणजे निरर्थक ठरविले तर मीमांसेतील एका सिद्धान्तालाच खो दिला जातो. मीमांसेत प्रायश्चित्तादी विधींचा ज्या रीतीने स्वर्गार्थ उपयोग आहे, तसा शिवदर्शनाचा विधी असून 'देवाचियेद्वारी' इत्यादी विधी स्वर्गसाधक अग्निहोत्रादी विधीप्रमाणे आहेत. याप्रमाणे भूतार्थवादाने विधीस्वरूप स्पष्ट होत असल्यामुळे ते प्रमाण आहेत. तेव्हा त्यांच्या योगाने शास्त्रीबोवांना वाद मिटविण्यात अडथळा कां व्हावा कळत नाही?

### *रूपक ठरविणारेच अप्रमाण*

वाद न मिटण्याचे तिसरे कारण शास्त्रीबोवा म्हणतात, 'आपल्या सर्व धार्मिक ग्रंथातील कथा बहुधा रूपकात्मक असतात.'' त्याचा खुलासा करण्याकरता त्यांनी गौतमपत्नी अहिल्या व इंद्र यांच्या कथेला कुमारिलभट्टांनी रूपक ठरविले हे उदाहरण दिले.

**'प्रत्ययाप्रत्ययौ हि सद्भावाभावयोः कारणम्'**

एखादी गोष्ट आहे किंवा नाही हे ठरविण्याचे साधन अनुक्रमे तसा प्रत्यय येणे किंवा न येणे हेच एक आहे असे आचार्यांचे म्हणणे आहे. तेव्हा धर्मग्रंथातील कथाभागांना कुमारिलभट्टादी मीमांसक रूपक ठरवितात म्हणून काही त्या रूपक होत नाहीत.

पूर्वमीमांसेत मंत्ररूप देवता मानल्या आहेत; विग्रहवान् म्हणजे शरीरी देवता मानल्या नाहीत व सर्व वेदांचे तात्पर्य कर्मावाचून नाही असेही ते म्हणतात, तेव्हा त्यांच्या या सिद्धान्ताप्रमाणे धर्मग्रंथांतील कथाभागांना कोणत्याही रीतीने व्यावहारिक अस्तित्व देता येत नसल्यामुळे मीमांसानुयायी कुमारिलभट्टांना त्या कथा रूपक म्हणजे त्यांना ऐतिहासिक अस्तित्व काही नाही हे म्हणणे भाग पडले. पण येथे कोणाही मीमांसकाचे म्हणणे प्रमाण नाही.

स्वर्गसाधक आचार कोणता, हे ठरविणे उत्तरमीमांसेचा विषय होय. उत्तरमीमांसेत देवताधिकरणात मंत्रमय देवता आहेत हे पूर्वमीमांसेचे म्हणणे खोडून देवता विग्रहवान आहे (अर्थात ज्या ठिकाणी स्पष्ट रूपक म्हटले असेल तो भाग सोडून बाकीचा) व कथाभाग इतिहासरूप असल्यामुळे प्रमाण आहे; असा स्पष्ट सिद्धान्त केला आहे. कोणत्याही ग्रंथात जे काही मुख्य सिद्धान्त गृहीत धरलेले असतात त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टींचे स्पष्टीकरण केलेले असते. पण गृहीत केलेल्या मुख्य सिद्धान्तापैकी एखादा सिद्धान्त चुकला असला म्हणजे त्याच्या अनुरोधाने केलेल्या एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरणही अर्थातच चुकलेले असणार. कुमारिलभट्टांचा कथाभाग रूपक ठरविण्यात असाच प्रकार झाला आहे. देवता जर शरीरधारी नाहीत तर इंद्र अहिल्येकडे आला इत्यादी कथाभाग कसा सत्य ठरणार? म्हणजे अर्थातच तो रूपक आहे असे म्हणणे प्राप्त होते. स्वर्गसाधक आचारविषयात जशी पूर्वमीमांसा प्रमाण मानली जाते तशी ती तात्विक विचारामध्येही प्रमाण मानल्यास सर्व उपनिषद्भाग (म्हणजे वेदभाग) अप्रमाण मानावा लागेल.

सांख्य-योग इत्यादी शास्त्रात जसे द्वैत इत्यादी एक-दोन वेदविरोधी सिद्धान्त आहेत तसेच पूर्वमीमांसेतही ईश्वराचा अंगीकार न करणे, देवता शरीरधारी न मानणे, इत्यादी वेदविरोधी भाग आहेत. तेव्हा या वेदविरोधी

सिद्धान्तावर उभारलेले उपसिद्धान्तही अप्रमाणच ठरतात; म्हणून धर्मग्रंथातील कथाभाग सत्य व ऐतिहासिक आहे असे मानणारे चुकलेले नसून ते शंकराचार्यमतानुयायी आहेत व त्यांना रूपक ठरविणारेच अप्रमाण आहेत असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते.

*प्रत्यक्षाशिवाय रूपक नाही*

पुन्हा या कथाभागांना रूपक म्हटले तरी तशी किंवा तत्सदृश गोष्ट अस्तित्वात असल्याखेरीज तीचे रूपक तरी करता येते काय? हाही एक प्रश्नच आहे व अस्तित्वात असलेल्या गोष्टीचेच रूपक होत असेल तर तशी गोष्ट घडली नाही, या म्हणण्यात कितीसे तथ्य असणार? 'जगात जी गोष्ट अस्तित्वात नाही त्याची कल्पनाही मनात येत नाही असा वेदान्तसिद्धान्तही आहे.' अहिल्या अस्तित्वात नसताना रात्रीला अहिल्या म्हणणे व इंद्र अस्तित्वात नसताना सूर्याला इंद्र म्हणणे शक्य आहे काय? इंद्र या शब्दाने दर्शविलेला अर्थ 'सूर्य' या शब्दाने दर्शविलेल्या अर्थाहून निराळा नसता तर रूपक तरी करता आले असते काय? सूर्य म्हणजे इंद्र व इंद्र म्हणजे सूर्य असा समानार्थी व्यवहार राहून रूपक होते हे कोणास पटत असेल तर खुशाल पटो, पण कथाभागाचे व्यावहारिक अस्तित्व मानल्याखेरीज रूपकाची ही सिद्धी होत नाही असे आम्हास वाटते.

पुन्हा इंद्र व सूर्य यांची स्वतंत्र रूपे पुराणात सांगितली आहेत; म्हणून धर्मग्रंथातील कथाभाग इतिहास आहे, असे भगवान् आचार्यांना प्रमाण मानणारे आम्ही म्हणतो. मंत्र-ब्राह्मण मिळून वेद आहे असे मानणाऱ्या वैदिक लोकांनी ब्राह्मणातील उपनिषद्भागातील तात्त्विक सिद्धांतांचे ग्रथन करणाऱ्या उत्तरमीमांसेशी विरोध येईल, अशा रीतीने एखादे वेदतात्पर्य काढल्यास ते प्रमाण कसे होईल? व अशा परिस्थितीत समेट न झाल्यास कोण जबाबदार?

(७-४-१९३५ महाराष्ट्र दैनिक नागपूर /

*लेखांक ३ रा : ५-५-१९३५ महाराष्ट्र दैनिक)*

**प्रक्षेपवाद : अप्रमाणिक**

''वाद न मिटण्याचे चवथे कारण आपल्या ग्रंथात झालेले प्रक्षेप हे होय'' असे शास्त्रीबोवा म्हणतात.

हा प्रक्षेपवाद सनातन वैदिक धर्मातील कोणत्याही प्राचीन आचार्यांनी किंवा विद्वानांनी स्वीकारलेला दिसत नाही. तेव्हा तो आधुनिक आहे यात शंका नाही. आर्यसमाज व आपल्याकडील पाश्चात्यांच्या ऐतिहासिक पद्धतीने ग्रंथाचा विचार करणारे जे आधुनिक विद्वान आहेत त्यांच्याच कडून याचा पुरस्कार केला जात आहे. पण या वादाला प्रमाण मानण्याइतके त्याचे प्रामाणिक अन्वेषण म्हणजे प्रत्यक्ष, अनुमान इत्यादी प्रमाणापैकी एखाद्या प्रमाणाच्या साह्याने त्याचा निश्चित व अबाधित निर्णय करणे होत नसते. अशा प्रसंगी जी काही अनुमाने केली जातात, त्यांना अनुमान म्हणणेच योग्य नसते. कारण अनुमान करताना जो अनुमानाला अबाधित हेतू असावा लागतो तो त्यात नसतो. त्यामुळे या अनुमानाने जो मग निष्कर्ष काढला जातो तो 'असे असावे किंवा तसे असावे' असा संशयग्रस्तच राहत असल्यामुळे निरनिराळे विद्वान निरनिराळे अनुमान व विधाने करितात. याचा परिणाम असा होतो की ज्याला जसे वाटेल तसे त्याने आपले मत बनवावे किंवा त्यात काही हांशील नाही सब झूट आहे म्हणून नास्तिक बनावे; यापेक्षा या प्रक्षेपवादापासून विशेष लाभ काही होत नाही. याच वादाच्या आश्रयाने दयानंदादिकांनी, त्यांना हिंसा मान्य नसल्यामुळे ती शास्त्रात मुळीच सांगितली नाही हे सिद्ध करण्याकरिता मन्वादीस्मृतीतून जेथे श्राद्धादी प्रकरणात मांस द्यावे म्हणून सांगितले आहे. तो भाग सर्व प्रक्षिप्त ठरविला. म्हणून मुळाशी जावून पाहता आपलेच म्हणणे शास्त्रसिद्ध आहे असे दाखविण्याकरिता प्रक्षेपवादाच्या जनकाने त्याला जन्म दिला आहे. तेव्हा प्रक्षेपवाद अप्रामाणिक असल्यामुळे वाद मिटण्यात त्याचा अडथळा कां निर्माण व्हावा हे समजत नाही.

*प्रक्षेप होणेच कठीण*

पुनः प्रक्षेपवाद मानला तरी लौकिक माणसाने एखाद्या लौकिक ध्येयाला धरून केलेल्या ग्रंथातच तो मानता येईल; व तेथेच तो प्रक्षेप पचेलही. पण आमच्या आर्ष ग्रंथात प्रक्षेप होणे अत्यंत कठीण आहे व पचणे तर शक्यच नाही. कारण आर्षधर्मातील स्वर्ग व मोक्ष ही ध्येये अलौकिक व अतीन्द्रिय असल्यामुळे त्यांच्याशी साधन ह्या नात्याने संबंध ठेवणाऱ्या आचार व विचार ह्यांची कल्पना कोणीतरी अलौकिक पुरुषांनी दिल्याखेरीज साधारण माणसांना आपण होऊन येणे शक्य नाही. भगवान् आचार्य म्हणतात -

**यद्यपि प्राकृताः प्राणिनो न जन्मान्तरव्यवहारमनुसंदधाना दृश्यन्ते,**

**तथापि न प्राकृतवदीश्वराणां भवितव्यम् ।**
**अतीत कल्पानुष्ठितप्रकृष्टज्ञानकर्मणां हिरण्यगर्भादीनां वर्तमानकल्पादौ प्रादुर्भवतां परमेश्वरानुगृहीतानां सुप्तंप्रति बुद्धवत् कल्पान्तरव्यवहारानुसंधानोपपत्तिः ।**
**''युगान्तेऽन्तर्हितान् वेदान् सेतिहासान् महर्षयः ।**
**लेभिरे तपसा पूर्वमनुज्ञाता स्वयंभुवा ॥''**

जरी साधारण पुरुषांना जन्मांतराचे ज्ञान नसते तरी सामर्थ्यसंपन्न ऋषींची गोष्ट तशी नाही. मागील कल्पात केलेल्या थोर साधनांच्या योगाने त्यांच्यावर परमेश्वराचा अनुग्रह होऊन आमचे ऋषी अलौकिक सामर्थ्याने व अतीन्द्रिय ज्ञानदृष्टीने संपन्न होतात व निजून उठलेल्या माणसाला जसे जागृतीतील पदार्थ प्रत्यक्ष दिसतात तसे सामर्थ्य संपन्न अशा ह्या ऋषींनाही नाना कल्पातील वस्तुस्थितीचे प्रत्यक्ष ज्ञान होते. हे ऋषी ब्रह्मदेवाच्या आज्ञेने परमेश्वराचे ठिकाणी अव्यक्त असलेली शास्त्रे व्यक्त दशेला आणतात. याप्रमाणे या अलौकिक आर्ष धर्मातील ग्रंथात हस्तक्षेप होणें सहसा शक्य नाही, म्हणूनच आजपर्यंत प्राचीन विचारसरणीच्या पुरुषाने प्रक्षेपशंका देखील काढली नाही. पुन्हा या ग्रंथात प्रक्षेप करणार तरी कोण? प्राचीन असोत वा अर्वाचीन असोत आस्तिक व पापभीरु लोकांकडून प्रक्षेप होणे शक्य नाही. दुसऱ्या धर्मातील लोकांनी आर्यांच्या आर्षग्रंथात प्रक्षेप करावे तर त्यांच्या धर्मग्रंथात आर्षग्रंथात प्रक्षेप करण्याजोगा विशेष विचार कोणताच नसून त्या ग्रंथातील मूलभूत सिद्धान्त वैदिकधर्मातूनच त्यांनी घेतले असल्यामुळे परधर्मियांनीही प्रक्षेप करणे शक्य नाही.

एवढ्यावरही जर प्रक्षेप शक्य मानले तरी वैदिक सिद्धान्त व प्रमाणपद्धती ज्यांना अवगत आहे अशा पुरुषांपुढे ते लपायचे नाहीत. लगेच उघडकीस येऊन धर्मबहिर्भूत होतील. वैदिकधर्मात परमेश्वराचे व साधूसंतांचे जे अवतार होतात ते एवढ्याकरिताच ! तेव्हा वैदिकधर्मातील तात्त्विक सिद्धान्त व प्रवृत्तिनिवृत्तिधर्मातील साधने ही उपलब्ध असताना प्रक्षेपवादाचे भूत उभे करून भिण्याचे कारण काय?

''ग्रंथकर्त्याचा जो मूळ सिद्धान्त असेल त्याविरुद्ध जर काही प्रतिपादन त्या ग्रंथातून आले असले व एकवाक्यतेच्या पद्धतीला अनुसरून जर समन्वय करता आला नाही तर तेथे प्रक्षेपाची शंका अपरिहार्य आहे.'' पण आज श्रुति-स्मृति-पुराणे इत्यादी जे आर्षग्रंथ उपलब्ध आहेत त्यातून वैदिक सिद्धान्ताशी विरोधी असा भाग कोठे दिसून येत नसल्यामुळे आर्ष धर्मग्रंथात प्रक्षेप झाले आहेत, हे मत आम्हाला मुळीच मान्य नाही.

*प्रक्षेप कोणी उत्पन्न केले ?*

आपल्या आर्षग्रंथात प्रक्षेप झाले आहेत ह्याचे प्रत्यंतर शास्त्रीबोवा सांगतात- ''दशोपनिषदांच्या जागी तीनशेच्या वर उपनिषदे गेलीत व शेवटी अल्लोपनिषदापर्यंत मजल गेली.'' पण पूर्वी दहाच उपनिषदे होती कशावरून? भगवान् आचाार्यांनी दहाच उपनिषदावर भाष्ये केली असे समजून जर हे विधान करण्यात आले असेल तर ते प्रमाण समजण्यास जागा नाही कारण दहा उपनिषदे सोडून श्वेताश्वतर व नृसिंहतापनीय या आणखी दोन उपनिषदावर आचार्यांचे भाष्य आहे. तेव्हा त्यांची काय वाट? शंकराचार्य या नांवामुळे घोटाळा होऊन कोण्या एखाद्या दुसऱ्या शंकराचार्यांनी केलेली भाष्ये आद्य शंकराचार्यांच्या नांवावर छापली गेली अशी कोणी शंका घेतील; पण प्रामाणिक पुराव्यावाचून ती अग्राह्यच ठरणार. किंवा ती भाष्ये सोडून दिली तरी भगवान आचार्यांनी आपल्या ब्रह्मसूत्रादी भाष्यातून दशोपनिषदांना सोडून कैवलोपनिषत्, नारायणोपनिषत् (ब्र.सू.३-४-२०) व जाबालोपनिषत् (ब्र.सू.अ.१-२-३२) ही उपनिषदे प्रमाणार्थ घेतली आहेत, तेव्हा पूर्वी दहाच उपनिषदे होती ही कल्पना निराधार आहे. शास्त्रीबोवांप्रमाणे पुष्कळ आधुनिक लोकही वैदिकधर्मग्रंथात प्रक्षेप झाले आहेत हे सांगताना अल्लोपनिषदाचा उल्लेख करीत असतात पण ते अल्लोपनिषद खरोखरच अस्तित्वात आहे किंवा सनातन्यांची टर उडविण्याकरीता कोणी खोटीच त्याच्या अस्तित्वाची कंडी उठविली हे सांगता येत नाही. आमच्या पाहण्यात मात्र हे उपनिषद आले नाही. हेच काय, पण शास्त्रीबोवांनी दिलेली उपनिषदांची संख्याही पाहण्यात किंवा वाचण्यात आली नाही. तरी हे नसतील असे मात्र आम्ही खात्रीने म्हणू शकत नाही. नुकतेच येथील सिटी कॉलेज मॅगेझिनच्या जानेवारीच्या अंकात एका विद्यार्थ्याने 'श्री वैशकूटोपनिषत्' दिले आहे. असे ग्रंथ एक दोन नाही हजारो जरी निर्माण झाले तरी जोपर्यंत धर्मग्रंथात ते अंतर्भूत होत नाहीत तोपर्यंत ते 'धर्मग्रंथातील प्रक्षिप्त ग्रंथ' म्हणून गणलेही जाऊ शकत नाहीत पण असले ग्रंथ

अगोदरच आर्षधर्मात अंतर्भूतच होऊ शकत नाहीत. कारण ज्याप्रमाणे तुकारामबोवाचा पार्ट करणाऱ्याला कोणी तुकारामबोवा समजत नाही. त्याप्रमाणे नुसते आर्षग्रंथाचे नांव धारण केल्यामुळेच काही ह्या ग्रंथांना तज्ज्ञ पुरुष आर्ष म्हणत नाही.

आर्ष धर्मातील ग्रंथ दोन प्रकारचे आहेत. एक अपौरुषेय व दुसरे पौरुषेय. अपौरुषेय ग्रंथांची मंत्रमय संस्कृतभाषा असून त्यातून मोक्षादिकांसंबंधी अलौकिक साधने व सिद्धान्त सांगितलेले आहेत. पौरुषेय ग्रंथाची भाषा संस्कृतच पण मंत्रसामर्थ्याला साधक असून त्यातूनही अलौकिक सिद्धान्त सांगितले आहेत. मंत्रप्रयत्नामुळे अपौरुषेय ग्रंथ तर कोणीही निर्माण करू शकत नाही. पौरुषेय ग्रंथ कदाचित् निर्माण होतील पण ते केवळ अनुवादक म्हणजे पूर्वीच एखाद्या आर्ष ग्रंथात सांगून ठेवलेल्या सिद्धान्ताचेच चर्वण करणारे होतील. तेव्हा अशा ग्रंथापासून काहीच हानी होण्याजोगी नाही. अल्लोपनिषदातील प्रथम अल्ला हा शब्द मुळींच मंत्रमय नाही. कारण तो विकृत आहे. तेव्हा या उपनिषदांची अपौरुषेय उपनिषदांत कोणी तज्ज्ञ पुरुष गणना करणार नाही; व म्हणून ते प्रक्षिप्तही म्हणता येत नाही, वैशकूटोपनिषदातला विषय अत्यंत व्यावहारीक व क्षुद्र आहे. तेव्हा त्याची कोणीही तज्ज्ञ केव्हाहि उपनिषद् ग्रंथात अंतर्भाव करणे शक्य नाही.

सारांश, ज्यांना वैदिक सिद्धान्त माहित आहेत अशा पुरुषाना प्रक्षेपाची मुळीच भीति वाटत नाही व म्हणूनच प्राचीन लोकांनी प्रक्षेपवादाचे खूळ गाजविले नाही. आधुनिक लोकांना पुष्कळसे वेदान्तसिद्धान्त काही अनुभव नसता देखील पटेनासे झाले आहेत; त्यामुळे पुराणादिकांतील विरोध नाहीसे होत नाहीत. असे वाटून धर्मग्रंथांत प्रक्षेप झाले आहेत असा त्यांनी सिद्धान्त काढला.

बरे, कदाचित् किरकोळ श्लोक प्रक्षिप्त असले तरी तेवढ्यावरून संपूर्ण ग्रंथ अप्रमाण ठरविणे म्हणजे एखाद्या सत्कुलाशी दूरचा संबंध वागविणारा एखादा पुरुष दुराचारी निघाला असता त्या सत्कुलाची निंदा करण्यासारखे असमंजसपणाचे होय.

*विरोधी सिद्धान्तच नाहीत*

पुराणेतिहास ग्रंथातून वेदान्ताने ज्यांची एकवाक्यता होऊ शकत नाही असे महत्वाचे विरोधी सिद्धान्त मुळीच नाहीत. आपल्या बुद्धीने एखाद्या वचनावरून एखादा सिद्धान्त काढून त्याच्या विरुद्ध वाटणारे सिद्धान्त किंवा वचने कोणी प्रक्षिप्त ठरवू पाहील तर तो ग्रंथाचा किंवा ग्रंथकर्त्याचा दोष नव्हे.

***''मीमांसा म्हणजेच एकवाक्यता''***

- पण वेदान्तानुसार विचार करणाऱ्या प्राचीन विद्वानांनी पुराणेतिहासातील विरोधाभासांची कल्पभेदाने, अधिकारी भेदाने, प्रयोजन भेदाने व देशकाल इत्यादी भेदाने एकवाक्यता केली आहे. त्या एकवाक्यतेचा जर आश्रय केला नाही तर सर्व शास्त्रांचे दोन्ही मीमांसेसह - प्रामाण्य लयास जाते. कारण **''मीमांसा म्हणजेच एकवाक्यता.''** याच एकवाक्यतेच्या बळावर पूर्वमीमांसेने आपले सिद्धान्त व उत्तर मीमांसेने आपले सिद्धान्त उभारलेले आहेत. ही एकवाक्यतेची पद्धती आवश्यक मानण्यांत आली. याचे कारण असे आहे की, वेदादी सर्व ग्रंथ जीवाच्या उद्धारार्थ निर्माण झाले आहेत. त्यात वेदादी अपौरुषेय ग्रंथाचा कर्ता साक्षात् परमात्मा असून पुराणेतिहासादी ग्रंथाचा कर्ता परमेश्वरच पण व्यासादी अधिकारिक महर्षींच्या द्वारा आहे एवढेच !

*अधिकारिक महर्षी : अपान्तरतमा नाम वेदाचार्यः*

याचा अर्थ असा की, शब्दार्थासह वेद भगवंतापासून प्रगट झाले; व पुराणेतिहासातील अर्थ ईश्वरप्रणीत असून शब्द मात्र ऋषीप्रणीत आहेत. हे सर्व पुराणेतिहासादी ग्रंथ निर्माण करणारे पुरुष ब्रह्मज्ञानाने ईश्वरस्वरूप होऊन परमेश्वराच्या आज्ञेने जगातील लोकांना मार्ग दाखविण्याकरिता निरनिराळ्या अधिकारावर नेमले गेलेले असतात. गीताभाष्यात भगवान आचार्य म्हणतात,-

**स भगवान् सृष्ट्वेदं जगत् तस्य च स्थिति चिकीर्षुः मरीच्यादीनग्रे सृष्ट्वा प्रजापतीन् प्रवृत्तिलक्षणं धर्मं ग्राहयामास वेदोक्तम् ।**
**ततोऽन्यांश्च सनकसनंदनादीन उत्पाद्य निवृत्तिलक्षणं धर्मं ज्ञानवैराग्यलक्षणं ग्राहयामास।**
**द्विविधो हि वेदोक्तो धर्मः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणः जगतः स्थितिकारणम् ॥**

**(शां.गीताभाष्य उपोद्घात्)**

याचा सारांश असा - प्रवृत्तिधर्म व निवृत्तिधर्म दोन्ही वैदिक आहेत, व जगत् धारणेकरिता अवश्य आहेत. प्रवृत्तिधर्म मरीच्यादी प्रजापतीकडून व निवृत्तिधर्म

सनकादिकांकडून ईश्वराने प्रगट केला. हे धर्म निर्माण करणारे अधिकारी पुरुष असून,

**अपान्तरतमप्रभृतयोऽपि ईश्वराः परमेश्वरेण तेषु तेषु अधिकारेषु नियुक्ताः सन्तः। अपान्तरतमा नाम वेदाचार्यः पुराणर्षिर्विष्णुनियोगात्कलिद्वापरयोः संधौ कृष्णद्वैपायनः संबभूवेति स्मरन्ति ।** (ब्र सू. शां. भा. ३-३-३२)

म्हणजे भगवान् व्यास अपांतरतमा ऋषीचे अवतार असून विष्णूचे आज्ञेने पुराणाचे विभाग करण्याकरिता कलिद्वापार संधीत प्रगट झाले म्हणून भगवान् व्यास पुराणेतिहास प्रगट करणारे अधिकारी होत. याप्रमाणेच निरनिराळ्या शास्त्रांचे अधिकारी आहेत. हे सर्व पुरुष -

''**सर्वे चैते समाधिगतसकलवेदार्थाः स्मर्यन्ते**''

ईश्वर शक्तीने संपन्न असल्यामुळे सर्वज्ञ म्हणजे सर्व शास्त्रात प्रवीण असतात. तरीपण आपल्या अधिकारापुरतेच त्यांचे कार्यक्षेत्र असते याप्रमाणे सर्व वेदादी ग्रंथातील ज्ञान एका ईश्वरापासूनच प्रगट होत असून ईश्वर निर्भ्रम व सर्वज्ञ असल्यामुळे नाना प्रकारच्या अधिकाऱ्यांकरिता व नाना प्रकारच्या देश,काल,कर्म,गति इत्यादिकांचा विचार करून साधन सांगणाऱ्या वेद पुराणातून प्रगट झालेल्या भगवदाज्ञेमध्ये विरोध असणे शक्य नाही. तेव्हा सर्वांची एकवाक्यता असली पाहिजे, या तत्त्वाला धरून एकवाक्यता पद्धती अस्तित्वात आली. या एकवाक्यतापद्धतीने विचार केला असता पुराणात विरोध किंवा प्रक्षेप दिसत नाहीत, आता पुराणावर इतर जे आक्षेप घेतले आहे त्यांचा विचार करू.

*विरोध कां दिसून येतो?*

शास्त्रीबोवा म्हणतात :- ''अठरा पुराणे, अठरा उपपुराणे आणि उपोपपुराणे किती आहेत याची तर गणनाच नाही आणि गंमत ही की, ती सर्वच्या सर्व व्यासांनी केली असे म्हटले पाहिजे.''

ही काय याप्रमाणे विश्वास बाळगणाऱ्यांची कुचेष्टा आहे किंवा भगवान् व्यासांची कुचेष्टा आहे हे समजत नाही. अठरा पुराणे तितकीच उपपुराणे ऐकण्यात आहेत. पण उपोपपुराण हे काय प्रकरण आहे हे समजत नाही. पुराणोपपुराणें यांचे कर्ते भगवान् व्यास म्हणून प्रसिद्ध असताना ते त्यांचे कर्ते नव्हेत, असे मानण्याचे कारण काय? तेहि पुरुषच त्यांचे ठिकाणी एवढे सामर्थ्य आले कोठून? असे म्हणावे तर आचार्य म्हणतात,-

**ऋषिणामपि मंत्रब्राह्मणदर्शिनां सामर्थ्यं नास्मदीयेन सामर्थ्येनोपमातुं युक्तम् ।** (ब्र. सू. शां. भा. १-३-३३)

ऋषींचे सामर्थ्य आपल्याप्रमाणेच होते असे म्हणणे साहस आहे.व्यासांच्या महाभारतादी ग्रंथातून प्रक्षेप झाला आहे असे म्हणणे जर प्रक्षेप दाखवून त्याची सिद्धी केली (म्हणजे हा भाग व्यासांच्या सिद्धांताशी विरुद्ध आहे किंवा प्रत्यक्ष अमुक गृहस्थाने तो रचला आहे हे दाखविणे) तरच शोभते; नाहीतर ते कल्पनातरंगच ठरणार. पुराणातून कोठे शिवाचे उत्तमत्व तर कोठे विष्णूचे उत्तमत्व जे सांगितले आहे ते वेदान्त सिद्धान्ताला - म्हणजे वेदान्तातील सगुणोपासनेच्या तत्त्वाला धरूनच आहे. भगवंताने गीतेच्या १७ व्या अध्यायात पुरुषाच्या ठिकाणी सात्त्विक राजस् व तामस् अशी तीन प्रकारची श्रद्धा उत्पन्न होते असे सांगितले आहे. या श्रद्धेनुसार ज्यांना जी देवता पूर्णब्रह्म स्वरूपाने पाहिली पाहिजे, म्हणजे सर्वात श्रेष्ठ समजली पाहिजे असे -

**ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् ।** (ब्र. सू. ४-१-५)

या सूत्रांत स्पष्टीकरण केले आहे. अर्थात उपासकाला आपल्या उपास्याच्या ठिकाणी पूर्ण ब्रह्मदृष्टी करावयास प्रवृत्त करताना त्याखेरीज दुसरी देवता कनिष्ठ ठरविल्यावाचून तसे करणे कसे शक्य आहे ? पूर्वमीमांसेतही निंदार्थवादाच्या द्वारे विधेयाकडे प्रवृत्ती केली असते. म्हणून पुराणांतून कोठे शिवाची निंदा तर कोठे विष्णूची निंदा केलेली जी दिसून येते, ती त्या त्या देवतेच्या उपासकांनी घुसडलेली नसून ग्रंथकर्त्यासच तशी योजना करावी लागली. 'श्रीकृष्णांनी शिवाची उपासना केली व शिवाने रुद्रगीताने कृष्णाची स्तुति केली' ह्या जनाला बोध करण्याकरिता त्यांच्या लीला होत व

**'शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयं शिवः'**

**हरिहरा भेद । काही नका करूं वाद ॥**

असे त्या लीलांचे तात्पर्य सर्व आचार्यानुयायी भागवत काढीत असतात. मध्वाचार्यांची निंदा अद्वैतज्ञानाचे दृष्टीने आहे व शंकराचार्यांची निंदा भक्तीच्या दृष्टीने आहे; म्हणजे याचा अर्थ असा की, मध्वाचार्यांनी द्वैतसिद्धान्त व प्रेमभक्ती प्रतिपादिली आहे पण या दोघांचा विरोध येतो. कारण परमप्रेमात द्वैत

भासण्याइतका आपलेपणा राहत नाही व राहिला तर ते परमप्रेम होणार नाही, म्हणजे शेवटी परमप्रेमाने अद्वैतच सिद्ध होत असताना त्यांनी द्वैताचे मण्डन केले म्हणून त्यांची निंदा आहे. आचार्यांनी भक्ती मान्य करूनही व अद्वैत जीवन्मुक्त स्थितीत भक्ती सिद्ध होत असतानाही आपल्या गंथातून तिचे स्पष्टीकरण केले नाही; व त्यामुळे आचार्यांना भक्ती मान्य नाही असा अज्ञानी जनांचा समज होतो. म्हणून त्यांची निंदा केलेली आहे. याचेही, मध्वाचार्यांचे द्वैत खोटे व आचार्यांनी प्रतिपादिलेल्या अद्वैत स्थितीत भक्ति होऊ शकत नाही हा समजही खोटा, असे तात्पर्य आहे.

शास्त्रीबोवा म्हणतात- पूर्वी एक भगवद्गीता होती. आज रामगीता इत्यादी दहाबारा गीता झाल्या आहेत.

असेच विधान गीतारहस्यातही आहे पण पूर्वी एक भगवद्गीता होती याला प्रमाण काय हे त्यांनाच माहीत. श्रीसमर्थांनी मात्र ह्या सर्व रामगीता प्रमाण मानल्या आहेत. समर्थ म्हणतात :-

**मत्सरे यांसी मिथ्या म्हणति । अवघेचि ग्रंथ उच्छेदिती ।**
**नाना ग्रंथांच्या संगति । भगवद्वाक्यें ॥१७॥**
**शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता ।**
**उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणि वेदान्त ॥१८॥**
**भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता ।**
**गणेशगीता यमगीता । उपनिषदे भागवत ॥१९॥**
**इत्यादिक नाना ग्रंथ । संमतीस बोलिले येथ ।**
**भगवद्वाक्ये यथार्थ । निश्चयेसी ॥२०॥**
**भगवद्वचनी अविश्वासे । ऐसा कवण पतित असे ।**
**भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणे येथीचे ॥२१॥** (दासबोध द.१ स.१)

या सर्व गीतांत वेदविरुद्ध कांही नाही म्हणून त्या प्रक्षिप्त ठरविणे सुलभ नाही.

*पुराणेतिहासाला सोडणे शक्य नाही*

शास्त्रीबोवा म्हणतात :- पूर्वी एक सत्यनारायण होता आता सत्यविनायकादि कथा अस्तित्वांत आल्या असतील.

तृणकाष्ठादी सर्व वस्तूत ईश्वर भरला असल्यामुळे त्या परमेश्वराची कोठेही व कोणत्याही स्वविहित साधनसामुग्रीने पूजा करण्याला उपासना शास्त्राची आडकाठी नाही; म्हणून एखाद्या आधुनिकानेही उपासना शास्त्रानुसार एखादे वस्तूचे ठिकाणी ईश्वरभावाने पूजा करण्यास सांगितले तरी ते अशास्त्रीय होत नाही. ह्यातील कथाभागही पूर्वकथेनुसार शास्त्रातूनच इकडून तिकडे जुळविलेला असतो. तेव्हा कथाभागातही संगती करण्यापेक्षा नवीन काही नसते व क्षुद्र प्रक्षेप असले तरी उपासना तत्त्वाची हानी न करताच दिलेले असल्यामुळे त्यापासून तात्त्विक हानी होत नाही **'मासोत्तमे मासे'** इत्यादी संकल्पातील प्रशंसा **'यस्य विवाहस्तस्य पूजनम्'** ह्या न्यायाप्रमाणे मानली तर सर्वत्रच विधिवाक्यता थोडीबहुत ती लावून दाखविला येईल. प्रत्येक मासाची 'मासोत्तमे मासे' म्हणून जी स्तुती केली आहे ती त्या महिन्यात जे स्नान, दान इत्यादी धर्म सांगितले असतील ते पाळण्याची प्रवृत्ति व्हावी यासाठी !

सारांश, प्रामाणिक बुद्धीने पुष्कळ प्राचीन विद्वान आजपर्यंत वेदपुराणांचे अवलोकन करीत आले, पण कोणी हा प्रक्षेपवाद हुडकून काढला नाही. उलट वेदार्थ करताना त्याचे साह्य घेत आले. पुनः पूर्वमीमांसेत जरी धर्म सांगितला असला तरी तेथे संपूर्ण धर्माचा विचार झाला नाही, म्हणजे पूर्वमीमांसेचे स्वर्ग हे एकच ध्येय असल्यामुळे त्याला साधनभूत असणारा जो अभ्युदय किंवा प्रवृत्तिधर्म व त्याचे ७ पूर्वादिक निधी ह्यांचेच त्यातून विवेचन केले आहे. पण स्वर्ग हेच काही एक वैदिक ध्येय नाही. निःश्रेयस हे एक दुसरे किंबहुना मुख्य वैदिक ध्येय आहे व त्याला साधनभूत निवृत्तिधर्म आहे. त्याचे विवेचन पूर्वमीमांसेतही नाही. हे सर्व पुराणेतिहासातून आले आहे व -

**तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणाः विविदिषन्ति ।** (बृ. उ. ४-४-२२)

या श्रुतीने पूर्वमीमांसेत सांगितलेला यज्ञादी प्रवृत्तिधर्म चित्तशुद्धीचे द्वारा निःश्रेयसाचे आवश्यक बाह्यांग आहे असे सांगितले आहे. तेव्हा त्या दृष्टीने निःश्रेयसाला साधन होणारे यज्ञादिक धर्म निवृत्तिकाली संपूर्ण जसेच्या तसे प्रवृत्तिप्रमाणेच असू शकतात किंवा नाही याचा पूर्वमीमांसेत विचार केला गेला नाही. तो पुराणेतिहासातून आला आहे तेव्हा मोक्ष ध्येयाला प्राधान्य देऊन त्याच्या बाह्यांगभूत यज्ञादिप्रवृत्तिधर्मांचा विचार करणाऱ्या पुराणेतिहासाला सोडून कसे भागेल?

'महाजनो येन गतः स पन्थः ॥' **हेही धर्मातील प्रमाण आहे.**

शास्त्रीबोवा म्हणतात :- महाजन म्हणजे मोठा जनसमूह की श्रेष्ठ पुरुष? पण साधारण जनसमूहाला आपल्या आर्षग्रंथातून धर्माचे बाबतीत प्रमाण मानिले नाही. श्रेष्ठ पुरुषांना विचारून धर्मनिर्णय करावा असेच सांगितले आहे. धर्माधर्म निर्णयाचे बाबतीत पातंजलयोग, ज्ञान व भक्ती ह्या साधनत्रयीने अतिशुद्ध झालेल्या बुद्धीलाच प्राधान्य दिले पाहिजे असे आधुनिक विद्वानात अग्रेसरत्व पावलेल्या लोकमान्यांनीही गीतारहस्यात म्हटले आहे. याप्रमाणे नव्या-जुन्यांचे या बाबतीत मतैक्य असताना शंकेला जागाच राहत नाही.

*(लेखांक ४ था)*

## लौकिक व अलौकिक शास्त्रे

तारीख १४-४-३५ च्या महाराष्ट्रात विद्याभूषण घुलेशास्त्री यांनी यज्ञीय पशुहिंसेबाबत शास्त्रार्थ व काही इतर विधाने केली आहेत, त्याचा आता विचार करू.

ज्या शास्त्रात जो तज्ञ असतो तो त्या शास्त्रातील वादाचा निर्णय करणारा खरा अधिकारी होय असे शास्त्रीबुवा म्हणतात. पण एखादा पुरुष निरनिराळ्या शास्त्रात सारखा तज्ञ व प्रमाण राहू शकत नाही काय? कोणत्याही शास्त्राला जे आपण प्रामाण्य देतो त्याला काहीतरी कसोटी असते. ती कसोटी म्हणजे बुद्धी होय. मनुष्य म्हणजे व्यक्ति व बुद्धी यांची जोडी आहे. तेव्हा बुद्धिमत्ता हा गुण वगळला तर नुसत्या व्यक्तीला कोणीही प्रामाण्य देणार नाही. कारण कोणत्याही शास्त्रातील विषय समजण्याकरिता व्युत्पन्न व अचूक शास्त्रार्थ ग्रहण करण्याची बुद्धीच मुख्यतः लागत असते; व ज्याला अशी बुद्धी आहे असे आपल्याला वाटते त्याला आपण प्रमाण मानतो. अर्थात् ज्याच्या ठिकाणी जितकी व्युत्पन्न व सूक्ष्म बुद्धि असेल तितका तो पुरुष श्रेष्ठ व प्रमाण समजला जाईल. पण ज्या शास्त्रात पुरुषांना प्रामाण्य संपादन करिताना पाहतो ती शास्त्रेही दोन प्रकारची आहेत. एक अलौकिक व दुसरी लौकिक. व्याकरण, वैद्यक इत्यादी व्यावहारिक पदार्थांचा विचार करणारी शास्त्रे लौकिक समजली जातात; व स्वर्ग, मोक्ष इत्यादी अलौकिक पदार्थांचा विचार करणारी पूर्वमीमांसादी शास्त्रे अलौकिक होत. वैद्यकादी लौकिक शास्त्रात प्राविण्य मिळविणे हे बुद्धी व मेहनत या गुणावर अवलंबून असून त्यांच्या साह्याने जो ज्या शास्त्रात प्रवीण होईल तोच त्या शास्त्रामध्ये प्रमाण असला तरी एखादा अचाट बुद्धीचा पुरुष एकटा देखील अशा अनेक लौकिक शास्त्रांमध्ये सारखे प्राविण्य संपादन करून एका एका शास्त्रामध्ये प्रवीण झालेल्यांनाही प्रमाणभूत झाल्याची उदारहणेही आपल्याला मिळू शकतात. असा पुरुष जसा वैद्यकात प्रमाण राहील तसाच तो व्याकरणातही राहील यात शंका नाही.

सारांश, एखाद्याला अनेक लौकिक शास्त्रात प्राविण्य मिळविता येते, ही लौकिक शास्त्राची गोष्ट झाली. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या अलौकिक शास्त्रातील स्वर्ग, मोक्ष व त्याची साधने ह्या अलौकिक विषयांचे ज्ञानही अर्थात् बुद्धीनेच होणार. पण येथे लौकिक शास्त्राध्ययनाला उपयोगी पडणारी जी बुद्धी मेहनत इत्यादी साधन सामुग्री ती अपुरी पडते. तेवढ्याने भागत नाही. म्हणजे अलौकिक शास्त्रात प्राविण्य व प्रामाण्य संपादन करण्याकरिता जी बुद्धी लागते ती शुद्ध असायला पाहिजे. ती बुद्धी ज्यांना लाभते ते पुरुष ह्या शास्त्रात प्रमाण होतात व ज्यांच्या ठिकाणी जितकी ही बुद्धी शुद्ध राहील तितके ते पुरुष सर्व शास्त्रात प्रमाण होतात. तेव्हा मीमांसेसारखी अलौकिक शास्त्रे समजण्याकरिता जी शुद्ध बुद्धी लागते तिचे लक्षण काय व ती कोणाला प्राप्त होऊ शकते हे आता आपण पाहू.

*शास्त्रतात्पर्य ग्राह्य कोणाचे?*

बुद्धी ही मुळात शुद्ध आहे; पण -

**बव्हर्थवादफलसाधनप्रकाशकेषु वेदवाक्येषु रता नान्यत् ।**
**स्वर्गप्राप्त्यादी फलसाधनेभ्यः कर्मेभ्योऽस्तीत्येवं वादिनो ॥**
**(शां.गीताभाष्य अ. २ श्लो. ४०)**

जोपर्यंत स्वर्गप्राप्ती इत्यादी नानाप्रकारच्या फलांच्या साधनभूत कर्माहून व त्या कर्माचे प्रतिपादन करणाऱ्या वेदवाक्याहून बुद्धीला दुसरे काही प्रमाण व श्रेष्ठ वाटत नाही. तोपर्यंत ती बुद्धी अशुद्ध असते; व ही अशुद्ध बुद्धी नाना साधन-साध्याचे ठिकाणी आसक्त असल्यामुळे शास्त्राध्ययनाचे वेळी आपल्या आसक्तीला अनुसरून ती शास्त्र-तात्पर्य काढीत असते. म्हणजे बुद्धि जोपर्यंत स्वर्गादी नाशिवंत फळाची आसक्ती निःशेष सोडून देत नाही तोपर्यंत ती शुद्ध होत नाही; व ही आसक्ती नाहीशी

झाली की बुद्धी शुद्ध झाली. पण ही स्वर्गादि फळांची बुद्धी केव्हा सोडणार? भगवान् म्हणतात -

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदायोगमवाप्स्यसि ॥ गी.अ.२-५३**

वरचेवर देहवाद सोडून जेव्हा बुद्धी परमात्म्याचे ठिकाणी स्थिर होते तेव्हा ती स्वर्गादी फलाशा सोडून अत्यंत शुद्ध होते. या शुद्ध व अशुद्ध बुद्धीलाच भगवंतानी अनुक्रमे 'व्यवसायात्मिका' व 'अव्यवसायात्मिका' अशी नावे दिली आहेत. परमेश्वराचे ठिकाणी स्थिर झालेल्या या बुद्धीला सर्व अतींद्रिय गोष्टींचे यथार्थ ज्ञान होते. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

**तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे ।**
**मग सकळशास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥** (ज्ञा. ६-४-५४)

ज्याची प्रज्ञा स्थिर झाली त्याचे मुखातून कोणतेही शास्त्रातील यथार्थ सिद्धान्त बाहेर पडतात. मनु म्हणतात -

**सर्वं ह्यात्मनि संपश्यन् नाधर्मे कुरुते मनः ॥ (मनुस्मृति अ.१२-१८)**

आत्म्याचे ठिकाणी सर्व जगत् कल्पित आहे असे पाहणाऱ्या ज्ञान्याच्या मनात कधीही अधर्म स्फुरत नाही. भारतकार म्हणतात -

**नाकृतात्मा वेदयति धर्माधर्मविनिश्चयम् ॥**

आत्मज्ञानावाचून खरा धर्माधर्म निश्चय कोणालाही होत नाही. श्वेताश्वतर श्रुति म्हणते-

**यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।**
**तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ।**

ज्यांची गुरूचे व ईश्वराचे ठिकाणी निःसीम प्रेमभक्ती असेल अशांनाच श्रुतीचे खरे अर्थ कळतात. योगभाष्यकार म्हणतात -

**तस्मिन् समाहितचित्तस्य या प्रज्ञा जायते तस्या ऋतम्भरेति नाम ।**
**अन्वर्था च सा ।**
**न तत्र विपर्यस्तज्ञानगन्धोऽप्यस्ति ॥**

परमेश्वराचे ठिकाणी ज्याचे चित्त लागले अशाच्या बुद्धीत कधीही चूक होत नाही.

**ईश्वरार्पितभावस्य समाधिसिद्धिर्यथा सर्वमीप्सित-अणिमतमं जानाति ।**

ज्याची बुद्धि ईश्वरार्पण झाली, अशाना सर्व इच्छित व खरे कळते.

सारांश ज्ञान, भक्ती व योग यांच्या योगाने बुद्धी शुद्ध होते व ती सर्व शास्त्रात प्रवीण होते; म्हणून त्याच बुद्धीने काढलेले शास्त्रतात्पर्य अगदी खरे निर्णायक व प्रमाण असते.

*निःश्रेयसाला प्राधान्य*

योग, ज्ञान, भक्ती या साधनत्रयीने युक्त असलेल्यांनाच संत किंवा साक्षात्कारी पुरुष ही संज्ञा आहे.

**ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ॥**

ही श्रुती सत्पुरुष आणि ईश्वर यात काही भेद राहत नाही असे स्पष्ट सांगत आहे. ईश्वरापासूनच सर्व शास्त्रीय ज्ञानाचा उगम आहे. ज्ञानभक्तीच्या योगाने संत हे पूर्ण परब्रह्मस्वरूप होतात, असा शास्त्राचा सिद्धान्त असताना ज्यांनी आपल्या पूर्ण ज्ञानभक्तीने परमेश्वरसायुज्यता प्राप्त करून घेतली व त्या पूर्णतेचे अनेकवेळी साक्षात् प्रत्यय दाखविले, त्या नाथादिकांसारख्या महानुभावांना ईश्वरनिर्मित वेदार्थ कळत नाही असे कोणता वैदिक म्हणू शकेल? ईश्वराने केलेल्या वेदाचा अर्थ जसा ईश्वराला माहीत तसाच जे त्याच्याशी ऐक्य पावले त्यांना माहीत. एरव्ही कोणालाही खरे वेदाचे तात्पर्य कळणे शक्य नाही; कारण वेदान्तावाचून इतर सर्व शास्त्रे द्वैत सिद्धान्ताचे म्हणजे जीव ईश्वरस्वरूप होत नाही याचे प्रतिपादन करणारी आहेत; व पूर्वमीमांसेला तर निःश्रेयसच मान्य नाही. तेव्हा 'द्वैत सिद्धान्तामुळे जे ईश्वरस्वरूप होत नाहीत किंवा ज्यांना ईश्वर मान्य नाही, अशा शास्त्रास किंवा त्या शास्त्राच्या तज्ज्ञास खरा वेदार्थ कळला' हे कशाच्या आधारावर म्हणता येते ?

सारांश, आत्मज्ञान, भक्ती यांच्या योगाने परमेश्वरस्वरूप झालेल्या अद्वैतभक्ताखेरीज कोणाचीही बुद्धी अत्यंत शुद्ध झालेली नसते. आत्मज्ञानादिकांच्या अभावी इतरांची बुद्धी कोणत्या तरी आग्रहादि विकाराने युक्त म्हणून अशुद्धच राहत असल्यामुळे सत्पुरुषच धर्माधर्माचे किंवा वेदादि शास्त्रावरील वादाचे खरे निर्णय करणारे अधिकारी होत, असेच शास्त्रावरून सिद्ध होते. त्यांची बुद्धी

कोणत्याही शास्त्रात सारखीच अप्रतिबद्ध चालू शकते; व तेच खरे शास्त्रतात्पर्य काढू शकतात; म्हणूनच मनूनेही -

**ब्राह्मणेषु च विद्वांसो विद्वत्सु कृतबुद्धयः ।**
**कृतबुद्धिषु कर्तारः कर्तृषु ब्रह्मवेदिनः ॥**
**(मनु स्मृ. अ १-९७)**

सर्वांत ब्रह्मज्ञानी श्रेष्ठ आहे असे म्हटले आहे. ही शास्त्रीय उपपत्ती सोडून ज्या शास्त्रातला जो तज्ज्ञ, तोच त्या शास्त्रातील वादाचा खरा निर्णय करणारा, असे जे शास्त्रीबोवांचे म्हणणे तेच जरी घटकाभर आपण मान्य केले तरी सुद्धा प्रस्तुत वादात संतांचाच निर्णय मानणे भाग पडते. कारण पूर्वमीमांसेने केवळ अभ्युदय हेच एक ध्येय ठेऊन जरी यज्ञादि धर्माचा विचार केला असला तरी वास्तविक पाहता अभ्युदय व निःश्रेयस अशी दोन प्रकारची वेदाची प्रयोजने असून व त्यातही निःश्रेयस हेच खरे व मुख्य ध्येय वेदाने ठरवून त्याचाच तात्पर्याने उपदेश केला असल्यामुळे निःश्रेयसाला प्राधान्य देऊनच यज्ञीय हिंसेचा विचार केला पाहिजे. त्याप्रमाणे -

निषेधसभेत ठरावातील 'अधर्म्य व अनावश्यक' या शब्दांचे स्पष्टीकरण करताना, वेदात पशुहिंसा सांगितली आहे. ती सांगितलीच नाही असे मी म्हणत नाही. पण मी भागवतमतानुयायी असल्यामुळे निःश्रेयसाला व भक्तीला प्राधान्य देऊन पशुविधीचा संतांनी जो विचार केला आहे, त्यावरून पाहता वैध हिंसाही अधर्म्य म्हणजे गौण व थोडी दोषावह आहे हे मी स्पष्ट आपले मत सांगितलेच होते.

यज्ञयागादि धर्म ईश्वरनिर्मित आहेत. ते काही एकट्या मीमांसकांचेच नाहीत व म्हणून एकट्या त्यांनाच त्याचा विचार करून निर्णय देण्याचा अधिकार नाही. स्वर्गप्राप्तीच्या दृष्टीने जसा मीमांसकांनी त्याचा विचार केला तसा, तेच धर्म चित्तशुद्धीच्या द्वारे मोक्षालाही साधनीभूत असल्यामुळे त्या दृष्टीने मोक्षधर्मियांनीही विचार केला. तेव्हा मोक्षधर्मानुसार पाहता पशुहिंसा आवश्यक व पूर्ण निर्दोषी आहे काय, या वादाचा निकाल संताच्या मतानुसारच केला पाहिजे.

*संत हेच प्रमाण*

मागे आम्ही पुराणेतिहासादिक ग्रंथ वेदानुकूलच असल्यामुळे आचार्यादि सर्व संतांनी त्यांचे प्रामाण्य मानले आहे व आचार्यानुयायांनीही ते कबूल केले पाहिजे हे दाखविलेच आहे. या लेखात ब्रह्मज्ञानी पुरुष ब्रह्मस्वरूप असल्यामुळे त्यांना प्रमाण न मानणे म्हणजे वेदांनाच अप्रमाण मानण्यासारखे आहे व ब्रह्मरूप झालेल्या पुरुषांचे बुद्धीत दुराग्रहादि कोणतेही दोष राहत नसल्यामुळे त्यांच्याकडून वेदाच्या प्रामाणिक अर्थाला सोडून भलतेच सांप्रदायिक सिद्धान्त शास्त्रातून काढले जातील हे शक्यच नाही. म्हणून सन्तांचे धर्माधर्म निर्णयही वेदानुकूलच असतात व तेच प्रमाण मानिले पाहिजेत हे दाखविले आहे. सारांश, वेदपुराणेतिहास व सन्त हे प्रमाण असल्यामुळे या वैध हिंसेबद्दल त्या सर्वांचे काय मत आहे हे आम्ही आता वाचकापुढे मांडतो.

*शुनःशेपाची ऐतिहासिक कथा*

**सर्वेषां वा एष पशुना मेधेन यजते यः पुरोडाशेन यजते । (ऐतरेय ब्राह्मण)**
**पुरोडाशयाग एव सर्वपशुसंबंधी यज्ञयोग्यहविर्भागः (सायण)**

पुरोडाशायाग हाच मेध्य याग होय.

**पुरोडाशनिर्वापणकर्तृणां कोऽभिप्राय इति सोऽभिधीयते ।**
**नोऽस्माकं केवलेन साधनान्तरनिरपेक्षेण मेध्यपूर्णेन पशुना इष्टमस्तु इति तदभिप्रायः। (सायण)**

भावार्थः- केवळ मेध्य पशूचे यजन व्हावे म्हणून पुरोडाशाचा निर्वाप केला पाहिजे.

**स वा एष पशुरेवालभते । (ऐ. ब्रा.)**
**पशुशरीरसादृश्यादयं पुरोडाशोऽनुष्ठितः पश्वालंभ एव भवति ।**

(सायण) पशूच्या अवयवाचे सादृश्य व अजादि पशुच्या ठिकाणचे मेध्यत्व निघून व्रीहीत आले व नंतर पुरोडाशाचे ठिकाणी पशुशरीराचे सादृश्य आहे म्हणून, पुरोडाशचे अनुष्ठान करणे म्हणजे पशुवधच होतो. हरिश्चंद्राच्या शुनःशेपावर पशूचा वध न करिता -

**'अन्वारब्धे' (ऐ.ब्रा.) शुनःशेप देह उपस्पृष्टवति सति ॥ (सायण)**

शुनःशेपाच्या देहाला स्पर्श करूनच ऋषींनी यज्ञ समाप्त केला व देवांनी ते विधान मान्य केले, असा ऐतरेय ब्राह्मणात इतिहास आहे. शास्त्रीबोवा नरमेध रूपक आहे

म्हणतात, तरी त्याची ती कल्पना आहे. वास्तविक तो इतिहास आहे.

*पशुविधान अधर्म्य*

नाथ महाराज म्हणतातः-

**वेदें बोलिले आलभन। त्या नांव म्हणती पशुहनन।**
**हे सकाम मानिती विधान। निष्कामा हनन कदा न घडे ॥२६३॥**
**पशुचे करू नये हनन। देवतोद्देशे अंगस्पर्शन।**
**या नाम बोलिजे आलभन। हें यज्ञाचरण निष्काम ॥२६५॥**
**देवतोद्देशे पशुघात। तेणें स्वर्गभोग होय प्राप्त।**
**तोही भोगक्षयें लया जात। तेणें हिंसा प्राप्त याज्ञिका ॥२७१॥**

श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात :-

**तैसी हिंसाची करूनी अहिंसा। निपजविणे हा ऐसा।**
**पै पूर्वमीमांसा। निर्णय केला ॥१॥**
**पेरिजे नुसती हिंसा। तेथ उगवेल काय अहिंसा।**
**परी नवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा ॥२॥**

भारतकार म्हणतात :-

इंद्राने यज्ञ केला तेव्हा त्या यज्ञातील पशूकडे पाहून ऋषी म्हणतात -

**नहि यज्ञे पशुगणा विधिदृष्टाः पुरंदर।**
**यवबीजैः सहस्राक्ष त्रिवर्षपरमोषितैः ॥**

भावार्थ - इंद्रा, यज्ञात पशु दिला पाहिजे असा विधी नाही. तीन वर्षाच्या जुन्या धान्याने यज्ञ कर.

अगस्ति आपल्या यज्ञाचे वेळी म्हणतात -

**स्पर्शयज्ञं करिष्यामि विधिरेष सनातनः।**

मी पशूच्या अंगाला स्पर्श करूनच यज्ञ करीन हा सनातन विधी आहे.

**अप्रोक्षितं वृथा मांसं विधिहीनं न भक्षयेत्।**
**भक्षयन्निरयं याति नरो नास्त्यत्र संशयः।**
**प्रोक्षिताभ्युषितं मांसं तथा ब्राह्मणकाम्यया।**
**अल्पदोषमिह ज्ञेयं विपरीतं तु लिप्यते।**
**प्रवृत्तिलक्षणो धर्मः प्रजार्थीभिस्तदाहृतः।**
**यथोक्तं राजशार्दूल न तु तन्मोक्षकांक्षिणाम्।**
**श्रूयते हि पुराकल्पे नृणां व्रीहिमयः पशुः।**
**येनायजन्त यज्वानः पुण्यश्लोकपरायणाः ॥**

भावार्थ :- अयज्ञीय मांसभक्षण तर नरकप्रदच आहे; पण यज्ञीय मांस भक्षणही थोडे दोषार्हच आहे. वैध हिंसा हा प्रवृत्तिधर्म आहे, तो मुमुक्षूचा मोक्षधर्म होऊ शकत नाही. याप्रमाणे मोक्षधर्माच्या दृष्टीने पशुविधान अधर्म्य व अनावश्यक आहे. याविषयी श्रुतिपुराणेतिहासातील प्रमाण आहे. योगशास्त्रात अहिंसेचा यज्ञामध्ये अन्तर्भाव केला असून अहिंसेचे लक्षण सांगतांना योगभाष्यकार म्हणतात,

**तत्राहिंसा सर्वथा सर्वदा सर्वभूतानांअनतिद्रोहः।**

केव्हाही कशाच्याही निमित्ताने कोणत्याही प्राण्याचा द्रोह न करणे ही अहिंसा होय. (योग सू.पा.२.शू.३०) पुढील सूत्रात तर धार्मिक हिंसेचाही योगसिद्धी करता त्यांनी निषेध केला आहे. असो, आता उत्तरमीमांसेच्या दृष्टीने पूर्वमीमांसेतील वैध हिंसेविषयीच्या शास्त्रार्थाचा विचार करू.

## लेखांक ६ वा

*तारीख १९-५-१९३५*

ब्राह्मणादि तीन वर्णांचा धर्म कोणता याचा विचार पूर्वमीमांसेत करून भगवान् जैमिनीने जे कर्मसिद्धांत त्यात दिले आहेत ते मुख्यतः स्वर्गप्राप्ती हे ध्येय ठेवून सांगितले आहेत. म्हणून ज्यांना केवळ स्वर्गच प्राप्त करून घ्यावयाचा आहे त्यांना पूर्वमीमांसेचे सर्व विधी व सिद्धान्त जसेच्या तसे पाळणे आवश्यक आहे. पण ज्यांना स्वर्गप्राप्तीच्या ऐवजी मोक्षप्राप्ती पाहिजे आहे त्यांना मात्र चित्तशुद्धिकरता धर्मविधीचे अनुष्ठान अवश्य असले तरी पूर्वमीमांसेतील विधी व सिद्धान्त जसेच्या तसे लागू होत नाहीत, असा उत्तरमीमांसेचा सिद्धान्त आहे. हे वैलक्षण्य कसे आहे हे आम्ही देत आहो.

*पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यांचा विरोध*

**यावज्जीवमग्निहोत्रं जुहूयात्।**

यावज्जीव अग्निहोत्राचे अनुष्ठान करावे असे पूर्वमीमांसेचे विधान आहे. पण आचार्य म्हणतात -

**अतो न यावज्जीवं कर्तव्यप्राप्तिः कस्यचिदपि कर्मणः ।**

**यावद्ध्यानयोगारोहणासमर्थस्तावत् गृहस्थेनाधिकृतेन कर्तव्यं कर्म ॥**

यावज्जीव केलेच पाहिजे असे कोणते कर्म राहू शकत नाही. ध्यानयोगाचा अधिकार प्राप्त होईपर्यंतच गृहस्थाने कर्म करावे.

**'ब्राह्मणस्य तु सोमविद्या प्रजमृण वाक्येन संयोगात्'** (पू.मी.अ.द.२-३)

या अधिकरणांत ऋषिऋण, देवऋण व पितृऋण अशी ही तीन ऋणे ब्राह्मणादिकांवर असल्यामुळे ती फेडण्याकरता -

**'विद्यामधियति' / 'वसंते वसंते ज्योतिषा यजेत' व 'प्रजा उत्पादयितव्या'** - अध्ययन करणे, ज्योतिष्टोमादि यज्ञ करणे व प्रजा म्हणजे संतति उत्पन्न करणे हे उपाय सांगितले आहेत व ते नित्य आहेत असे पूर्वमीमांसा म्हणते; तर आचार्य म्हणतात -

**ऋणप्रतिबंधाश्चाविदुष एव मनुष्यपितृदेवलोकप्राप्तिंप्रती, न विदुषः ।**

ऋष्यादिकांचे ऋण न फेडल्यास मनुष्यलोक, पितृलोक व देवलोक यांच्या प्राप्तीस प्रतिबंध होतो. पण तो प्रतिबंध अज्ञान्याला होतो. पण ज्ञान्याला किंवा मुमुक्षूला लोकप्राप्तीची इच्छा नसते. म्हणजे पूर्वमीमांसेच्या दृष्टीने जो नित्यविधी तो उत्तरमीमांसेच्या दृष्टीने काममूलक म्हणजे स्वर्गादि लोकांची प्राप्ती करून देणारा ठरतो; आणि हे नित्यविधी न केले असता प्रत्यवाय होतो म्हणून जे म्हटले आहे व त्यांच्याकरता जे प्रायश्चित सांगितले आहे ते अर्थातच ज्यांच्या अंतःकरणात मेल्यानंतर चांगल्या लोकाला जावे असे असून, त्या लोकांच्या प्राप्तीकरता जी नित्यकर्मे सांगितली आहेत ती जे लोक करीत नाही, त्यांनाच ते प्रत्यवाय व प्रायश्चित लागू होतात. इतरांना म्हणजे मोक्षेच्छूंना व मोक्षाकरिता निवृत्तिधर्म पाळणाऱ्यांना लागू होत नाहीत,

**नित्यानां च कर्मणां पुण्यफलत्वश्रुतेः**

**मोक्षस्य चाकार्यत्वान्मुमुक्षोः कर्मानर्थक्यम् ।**

**नित्यानि प्रत्यावायपरिहारार्थमनुष्ठेयानि इतिचेत् ।**

**न । असंन्यासिविषयत्वात् प्रत्यवायप्राप्तेः ॥**

नित्यकर्मालाही फळ आहेच. मोक्ष हे कर्माचे फळ नसल्यामुळे मोक्षेच्छूंना कर्माची आवश्यकता नाही. प्रत्यवाय उत्पन्न होऊ नये म्हणून नित्यकर्म मुमुक्षूनेही केले पाहिजे, हे म्हणणे बरोबर नाही. स्वर्गेच्छु गृहस्थालाच नित्यकर्माच्या अभावी प्रत्यवाय सांगितला आहे. कारण,

**मुमुक्षोः सर्वकर्मसंन्यासविधानात् ।**

मुमूक्षूला सर्व कर्मांचा संन्यासच सांगितला आहे. इत्यादि आचार्यांच्या वचनावरून स्पष्ट होते. कोणी म्हणतील, हे सर्व उपपादन संन्यास विषयकच आहे; पण असे घटकाभर मानले तरी संन्यास सोडून कर्मयोगातही (मोक्षमार्गे कर्मयोगे) भगवान् म्हणतात,

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**

**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ गीता.**

आरंभिलेल्या कर्माचा नाश होत नाही किंवा कोणता प्रत्यवाय उत्पन्न होत नाही. अल्पसाही धर्म संसारभयापासून सोडवितो. सारांश, चित्तशुद्धिकरता प्रथम जरी नित्यकर्म करावे लागले तरी शेवटी मोक्षमार्गात ते सुटते. या कर्म सुटण्याचा प्रकार भागवतामध्ये श्रीधराचार्यांनी दिला आहे. तो असा -

**तत्र काम्यकर्मसु प्रवर्तमानस्यैव सर्वात्मना विधिप्रतिषेधाधिकारः ।**

**निष्कामकर्मयोगाधिकारिणस्तु यथाशक्ति ।**

**स च ज्ञानभक्तियोगाधिकारात् प्रागेव ।**

**तदधिकृतयोस्तु स्वल्पः । ताभ्यां सिद्धानां तु न किंचिदिति ।**

भावार्थः- सकाम पुरुषांनाच सर्व विधी-प्रतिषेध लागू होतात. निष्कामांना त्यांच्या परमार्थाच्या निष्ठेस पोषक एवढेच विधि-प्रतिषेध लागू आहेत, पण तेही त्यांना ज्ञान-भक्तीचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वी ! ते अधिकार प्राप्त झालेल्यांना फार थोडे व सिद्धांना तर कोणतेच विधिप्रतिषेध नाहीत.

*मोक्षध्येयाचे दृष्टीने ' परिसंख्या'*

याचप्रमाणे पूर्वमीमांसेतील - **अग्निष्टोमीयं पशुमालभेत ।** हे कर्म त्यांच्या मते अपूर्व व नित्य जरी असले तरी, ते स्वर्गफलाच्या दृष्टीने आहे. कारण स्वर्गादि अदृष्ट म्हणजे मेल्यानंतर प्राप्त होणाऱ्या फलाकरिताच मीमांसकांनी अपूर्वाची कल्पना केली आहे. स्वर्गफलाचा संबंध सुटल्यानंतर मात्र ते कर्म अपूर्व राहणे शक्य

नाही.

**विधिरत्यंतमप्राप्तौ नियमः पाक्षिके सति ।**

**तत्रचान्यत्र च प्राप्तौ परिसंख्येति कथ्यते ॥**

जो शास्त्रावाचून मुळी समजत नाही तो अपूर्वविधी होय. पक्षाने प्राप्त तो नियमविधी व रागतः प्राप्त तो परिसंख्याविधी होतो. 'पशुमालभेत' याविधीचा पूर्वमीमांसेत स्वर्गाशी संबंध लावला आहे. हा संबंध शास्त्रावाचून आपल्याला कळणे शक्य नाही. पण पश्वालंभनच आपल्याला मुळी माहित नाही असे नाही. तेव्हा मोक्षेच्छूंने स्वर्गसंबंध सोडला असता आलम्भन विधीतील अपूर्वांश निघून जातो व मग रागतः प्राप्त अशा परिसंख्या विधीत त्याची गणना होते असे भागवतधर्मानुयायांचे म्हणणे आहे. **'अहरहः संध्यामुपासीत'** ह्या विधीतील किंवा **'अग्निहोत्रं जुहुयात्'** या विधीतील सर्व अंश जसा अपूर्व आहे तसा पशुमालभेत या विधीत सर्व अंश अपूर्व नाही फक्त त्याचा स्वर्गाशी प्रधानत्वेकरून जो संबंध दाखविला आहे तोच अपूर्व आहे. परिसंख्याविधी व नियमविधी यातही किंचित् अपूर्वांश असतोच; म्हणून ते साक्षात् विधिचाच बोध करितात; पण त्याचे तात्पर्य दुसऱ्याच्या निवृत्तीत असते. या दृष्टीने मग 'पशुमालभेत' या विधीचा विचार केला म्हणजे मांस खाण्याच्या स्वाभाविक इच्छेस आळा घालण्याकरिता हे विधी आहेत असे मोक्षधर्मीय साधुसंतांचे म्हणणे योग्य ठरते. याच दृष्टीने मन्वादि स्मृतिकाराने **'निवृत्तिस्तु महाफला'** (मनुस्मृ.५-५६) मुळीच मांस न खाणे मोक्षाला प्राप्त करून देणारे आहे,

**नानिष्टा नवसस्येष्ट्या पशुना चाग्निमान् द्विजः ।**

**नवान्नमद्यान्मांसं वा दीर्घमायुर्जिजीविषुः ॥२७॥ (मनुस्मृ.अ.४)**

भावार्थः- आग्रायणेष्टी केल्यावाचून नवे धान्य खावू नये व पशुयाग केल्यावाचून मांस खावू नये असे परिसंख्यात्मक तात्पर्य काढले. वानप्रस्थाश्रमात अग्निहोत्रादि सर्व कर्मे करावी लागतात. पण तेथे,

**मुन्यन्नैर्विविधैर्मेध्यैः शाकमूलफलेन वा ।**

**एतान्नेव महायज्ञान्निर्वपेत् विधिपूर्वकम् । (मनु. स्मृ ६-५)**

मुनींच्या नीवारादि अन्नांनी, कंदमूल फलांनी हे सर्व यज्ञ करावे व 'वर्जयेन्मधुमांसं च' (मनु स्मृ. ६-१४) मधु व मांस सवर्था वर्ज करावे असे सांगितले आहे.

सारांश, या सर्वांचा विचार करता स्वर्गाकरता अपूर्वविधी, त्याने सांगितलेले पशुयाग, ते ध्येय सुटल्यावर मोक्षाच्या दृष्टीने परिसंख्यात्मकच ठरतात हे पूर्वमीमांसेतील विधीलक्षणावरून पाहता सिद्ध होते.

*अवैदिक भागवत संप्रदाय कोणता ?*

भागवत सांप्रदायाविषयी लिहितांना शास्त्रीबोवा म्हणतात -

''या पंथापेक्षा आर्यसमाज एकदाचा बरा. कारण आर्यसमाजी वेदापुढे काही प्रमाण मानित नाहीत व भागवत लोक आपल्या पंथातील ग्रंथापुढे वेदाला तुच्छ समजतात. आचार्यांनी हा पंथ वैदिक नाही असे स्पष्ट म्हटले आहे?''

भागवत संप्रदायापेक्षा शास्त्रीबोवांना आर्यसमाज जवळचा वाटावा हे योग्यच आहे, कारण एक पशुहिंसा सोडून काही शास्त्रीबोवांची मते आर्यसमाजासारखीच दिसतात. दोघांनाही पुराणग्रंथ मान्य नाहीत, जर शास्त्रीबोवा आर्यसममाजाला जवळ करीत असले तर खुशाल करोत. त्याविषयी आम्हाला त्यांना काही म्हणावयाचे नाही. पण भागवतसंप्रदाय म्हणजे नाथादि सत्पुरुषांनी ज्याचा पुरस्कार केला तो अवैदिक आहे व आचार्यांनी त्याचे खण्डन केले हे विधान वाचून तर शास्त्रीबोवांच्या गाढ अज्ञानमूलक विपरीत समजुतीची कीव येते. कारण आचार्यांनी खण्डन केलेले भागवतमत पंचरात्राला प्रमाण मानून चालणारे आहे. त्यातच वेदाची निंदा, शांडिल्याची कथा व जीवादिकांची उत्पत्ती सांगितली आहे. नाथादि सत्पुरुषांचा भागवतसंप्रदाय, भागवतादी पुराणे, उपनिषद् इत्यादि ग्रंथानुसार आहे. या भागवतसंप्रदायात वेदाची निंदा, जीवोत्पत्ती यापैकी कोणताही अवैदिक प्रकार नसून तो पूर्ण वैदिक म्हणजे वेद, पुराणे, इतिहास, उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्र, स्मृती इत्यादि सर्व ग्रंथ प्रमाण मानणारा व तदनुकूल आचार विचाराला प्राधान्य व प्रामाण्य देणारा आहे. आज भागवत संप्रदायात प्रमाण मानलेल्या भागवत ग्रंथाचे परिशीलन करणारे पुष्कळ हरिभक्तपरायण शास्त्री, पुराणिक आहेत. त्यांना आचार्यांनी ज्या अवैदिक विचारामुळे पंचरात्रानुयायी भागवताचे खण्डन केले तसे अवैदिक विचार भागवत धर्मात (भागवत पुराणात) आहेत काय? हे शास्त्रीबोवांनी विचारून पहावे. विजयध्वजी म्हणून जी एक वैष्णव मताची भागवतावर टीका आहे तींत टीकाकाराने भागवतावर आचार्यांची टीका (भाष्य) असल्याचा उल्लेख केला आहे. वेदासह सर्व आर्यग्रंथाना व आचारविचारांना प्रमाण मानणारा ग्रंथ व तदनुयायी भागवत

यांच्यापेक्षां शास्त्रीबोवास आर्यसमाजी आवडत असतील तर खुशाल आवडोत. हा आवडीचा प्रश्न आहे, पण अवैदिक म्हणून जे भागवत मत आहे ते मात्र नाथादिकांनी पुरस्कार केलेले नव्हे हे आम्ही आव्हान देऊन सांगतो.

*आमचे साक्षीदार व्यास*

आमचे साक्षीदार म्हणून शास्त्रीबोवांनी (१) उपरिचर वसूचे आख्यान (२) श्रीमद्भागवत (३) यज्ञानां जपयज्ञोऽस्मि (४) व एकनाथमहाराज अशी चार नावे दिली. पण खरे पाहता आमचा साक्षीदार एकच भगवान् व्यास. भारत, भागवत व गीता एका व्यासांनी लिहिली. या वैध हिंसेसंबंधी झालेल्या वसूच्या साक्षीचा भारतातून तीन ठिकाणी उल्लेख केला असून इंद्राने वसूला आपल्या अर्ध्यासनाचा मान दिल्यामुळे वासुदेवाचाच पक्षपात करून बोलला असा त्याच्यावर व्यासांनी शेरा मारला व शेवटी -

**तस्मान्न वाच्यं ह्येकेन बहुज्ञेनापि संशयं प्रजापतिमपहाय ।**

ब्रह्मदेवावाचून कोणीही एकट्याने धर्माधर्माच्या संशयाचा निकाल लावू नये असा उपदेश केला. पण ही गोष्ट ब्रह्मज्ञान्यास लागू नाही. कारण ब्रह्मज्ञान्यांची योग्यता वर्णन करताना आचार्य म्हणतात -

**आम्नायस्यापि तत्प्रभवत्वात् ।**

(ऐतरेयोपनिषद्)

सर्व वेदादी शास्त्रे त्यांच्यापासून उत्पन्न झाली.

शास्त्रीबोवा म्हणतात उपरिचर वसूने पशुबली घ्यावा असा निर्णय दिल्यावर चिडून ऋषींनी शाप दिला. हे विधान त्या काळच्या ऋषींच्या योग्यतेवर चांगलेच प्रकाश पाडणारे आहे म्हणावयाचे. ऋषींनी रागावून शाप दिला या वचनाबरोबरच 'देवांचा पक्ष घेऊन वसूने निकाल दिला' हे तेथेच भगवान् व्यासानी म्हटले आहे. तेव्हा वसूच्या पक्षपातामुळे ऋषी चिडले की आपल्याविरूद्ध निकाल दिल्यामुळे चिडले याचा वाचकांनी विचार करावा.

*भागवतावरील आक्षेप फोल*

भागवत पुराण व्यासांनी केले नाही असे शास्त्रीबोवा म्हणतात. भागवत पुराण व्यासकृत नाही, बोपदेवकृत आहे असा देवीपुराण भक्तांनी वाद उत्पन्न केला आहे; पण तो जुना आहे, असे शास्त्रीबोवा म्हणत असले तरी तो जुना नाही. कारण दुसऱ्या कोणत्याही प्राचीन ग्रंथकारांनी किंवा टिकाकारांनी त्याचा उल्लेख केला नाही. बोपदेव हे श्रीज्ञानेश्वर महाराजाच्या समकालीन होते असे कित्येक म्हणतात व श्रीज्ञानेश्वर महाराजांनी तो ग्रंथ व्यासकृतच मानला आहे. बोपदेवाच्या नांवावर जे ग्रंथ आहेत त्यात भागवताचा उल्लेख नाही. श्रीहरिलीला म्हणून एक छोटा ग्रंथ बोपदेवानी केला आहे. त्यात भागवतच प्रमाण मानले आहे. पुन्हा स्वतः बोपदेवानी भागवत करून आपले नांव त्यावर न घालता व्यासांचे नांव घालण्याचे प्रयोजनही काहीच दिसत नाही. भागवतासारखा काव्य, रसमय व पूर्ण वैदिक विचारांनी भरलेला ग्रंथ बोपदेवानी आपले नांव घातले असते तरी प्रसिद्धीस आलाच असता. असो, हा विषयच अगदी स्वतंत्रपणे विचार करण्याजोगा आहे पण त्याचे हे स्थळ नव्हे आम्हाला भागवतावरील असे आक्षेप फोल वाटतात.

शास्त्रीबोवा म्हणतात :- मत्स्यपुराणावरून पाहता अठरा पुराणानंतर भारत झाले व भारतानंतर भागवत झाले तर त्याचा अठरापुराणात अंतर्भाव कसा?

स्कंदपुराणात भागवत माहात्म्य दिले आहे. त्यांच्या सारखे अधिकारिक पुरुष पुराणादि ग्रंथ कसे निर्माण करू शकतात व वेदान्तानुसार पाहता 'सामान्य व विशेषचित्तसंयमास अनुसरून वरील विरोध नाहीसा होऊ शकतो किंवा नाही' हे माझ्यापेक्षा जे वेदान्तादिकात विशेष अधिकारी आहेत त्यांना त्यांनी विचारून पाहावे म्हणजे शंका दूर होईल. माझा तो अधिकार नाही.

''महाभारतात परीक्षिताच्या मरणाचा वृत्तान्त आला असून त्याला भागवत सांगितले असे कोठे म्हटले नाही, म्हणजे परिक्षिताला भागवत सांगितले गेले हेच सिद्ध होत नाही.'' असे शास्त्रीबोवाचे म्हणणे.

याचे उत्तरही समर्थ वेदान्ती देवू शकतो. मला तेवढा वेदान्त समजत नाही. पण या शंकेचा उलगडा वेदान्तानुसार व्हावा एवढा विश्वास मात्र वाटतो.

उपरिष्टात् या शब्दाचा प्रयोग ''या अर्थी'' बोलणारा करीत नसतो. पण भागवतात (स्कं. ५-४-१२) हा चूक प्रयोग आला आहे तेव्हा हा प्रयोग कोणी तरी घुसडला हे शास्त्रीबोवांचे म्हणणे.

मला विशेष काही जास्त संस्कृत येत नाही पण अमुक एक प्रयोग व्याकरणरीत्या शुद्ध असताना तो लिहिण्यात येतो, पण बोलण्यात मात्र येत नाही

असा भेद कसा करता येतो हे समजत नाही.

**कल्याणातरावर्तसा कल्याण संपदुरिष्टद्भवस्तु ।**

हे वाक्य 'मालतीमाधव' नाटकात माधवाचे तोंडी बोलण्यात आले आहे. पातंजल योगातील प्रथम सूत्रावर भाष्यकारांनी सविकल्प समाधीचे प्रकार सांगताना,

**स च वितर्कानुगतोविचारानुगत आनंदानुगत,**
**अस्मितानुगत इत्युपरिष्टान्निवेदयिष्यामः ।**

असा भागवतकाराप्रमाणेच पुढे अर्थी बोलण्यात प्रयोग केला आहे.

*भागवतकारांनीही निवृत्तिच ठरविली.*

भागवतातील -

**लोके व्यवायामिषमद्यसेवा ।** या श्लोकात भागवतकारांनीही वैध हिंसा हिंसा नव्हे असेच म्हटले आहे व यज्ञातील पशुहिंसेला भागवताची अनुज्ञा म्हणजे परवानगी आहे, असे शास्त्रीबोवा म्हणतात. पण हा निष्कर्ष वाचून हसूंच येते. वास्तविक तर **लोके व्यवायामिषमद्यसेवा** या श्लोकांत भागवतकार म्हणतात- रागतः प्राप्त अशा आमिष सेवनादि स्वैराचाराला, यज्ञाचा संकोच किंवा परिसंख्याविधी सांगून स्वैराचाराला मर्यादित केले व पुढच्या श्लोकात श्रीधर म्हणतात,

**पूर्वोक्तव्यवायादि व्यवस्थामपि संकोचयन्नाह ।**

म्हणजे या श्लोकात पुनः मागील श्लोकात जो संकोच केला आहे त्यालाही संकोचित केले. या म्हणण्याचे तात्पर्य असे की,

**लोकेव्यवायामिषमद्यसेवा ॥ व**
**यद्घ्राण गंधो विहितः सुरायाः ॥**

हे दोन श्लोक उत्तरोत्तर संकोच सांगणारे आहेत. १- मांस खावयाचे तर यज्ञ करून खावे हा पहिल्या श्लोकातील संकोच आहे. २- स्वतः मांस खाण्याच्या इच्छेने यज्ञ करण्यापेक्षा मांस खाण्याची इच्छा सोडून देवतेच्या उद्देशाने पशुहनन करणे बरे हा पुढला संकोच आहे.

देवतोद्देशाने केलेली हिंसा, हिंसा नव्हे म्हणजे ती नरक देणारी नाही, पण 'आसुनिवृत्तिरिष्टा' सर्वथा हिंसा सोडून देणे हे उत्तम व महाफलदायी म्हणजे मोक्षदायी आहे असे मनुप्रमाणे भागवतकारांचेही मत आहे. ज्याला पूर्ण निवृत्ति साधत नाही त्याला मर्यादित अनुज्ञा देणे म्हणजे परवानगी देणे नव्हे तर त्याच्या प्रवृत्तीचा संकोच करीत करीत पूर्ण निवृत्तिवर त्याला आणणे होय.

तात्पर्य, संकोचाचे विधान किंवा परिसंख्या विधी हे अनुज्ञारूप जरी असले तरी त्याचे पर्यवसान निवृत्तीत असते; म्हणून भागवताकारांनी पशुहिंसेला अनुज्ञा म्हणजे परवानगी दिली असे म्हणणे म्हणजे अर्थविपर्यास करणेच होय. स्वर्गध्येयाच्या दृष्टीनेच पशुहिंसा होत नाही हेच वर आम्ही दाखविल्याप्रमाणे भागवताकरांचेही मत आहे.

*जपयज्ञ स्तुती नव्हे*

**'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'** इत्यादि वाक्ये निव्वळ स्तुतिरूप आहेत असे शास्त्रीबोवा म्हणतात.

**विधियज्ञाज्जपयज्ञो विशिष्टो दशभिर्गुणैः ॥**

विधियज्ञापेक्षा जपयज्ञ दशपट श्रेष्ठ आहे. उपांशुजप शतपट व मानसजप हजारपट श्रेष्ठ आहे. जपयज्ञाची योग्यता कोणास येत नाही. ब्राह्मणाने जप केला म्हणजे पुरे; दुसरे काही करो की न करो. तो ब्राह्मणापासून भ्रष्ट होत नाही (मनु.अ.२.श्लोक ८५/८६/८७) (टीप :- जपेन्नेव तु संसिध्येद् ब्राह्मणो नात्र संशयः। कुर्य्यादन्यन्न न वा कुर्यान्मैत्रो ब्राह्मण उच्यते ॥८७॥मनु.अ.२.) असे मनूने सांगितले आहे.

पंचमहायज्ञात एक स्वाध्याय यज्ञ आहे. जपयज्ञ स्वाध्यायात येतो, भगवंताचे विशेष चिंतन कोठे होत? असा अर्जुनाचा प्रश्न होता व त्यावर भगवंतांनी आपल्या विशेष अस्तित्वाची ठिकाणे सांगितली व त्या दृष्टीने जपयज्ञ श्रेष्ठ सांगितला. तेव्हा **'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि'** ही केवळ स्तुती कशी होते हे शास्त्रीबोवांनाच माहीत. आचार्यांनी मात्र तसे विधान कोठेही केले नाही. गोष्टीचे श्रेष्ठत्वसूचक वर्णन असले म्हणजे ते सदा स्तुत्यर्थकच असते असे मुळीच नाही. जेथे असे वर्णन वस्तुस्थिती नसते तेथे ते वर्णन स्तुतिरूप होईल. पण जेथे तशी वर्णनानुसार वस्तुस्थिती असते तेथे ते वर्णन प्रशंसारूप होत नाही. गायत्री, ॐकार किंवा नाम यांचा जप, वेदान्ताच्या दृष्टीने ब्रह्मप्राप्ती करून देणारा आहे. पण कोणतेही विधिकर्म ब्रह्मप्रापक नाही; म्हणून विधियज्ञापेक्षा जपयज्ञ श्रेष्ठ म्हटला ही खोटी स्तुती नव्हे. नाहीतर -

**ज्ञानादेव तु कैवल्यम् ॥ किंवा नान्यः पंथो विद्यतेऽयनाय ॥**

ही स्तुतिच म्हणावी लागेल. नाथादिकांचे म्हणणे वेदविरुद्ध नाही, उलट त्यांचेच

म्हणणे श्रुतिसिद्ध आहे.

*श्री शंकराचार्य काय म्हणतात?*

''भगवान् आचार्यांनी **'अशुद्धमितिचेन्न शब्दात्'** या सूत्रावरील भाष्यात वैध हिंसा नरकदायी म्हणजे अधर्म नव्हे असे म्हटले आहे'' असे शास्त्रीबोवांचे म्हणणे.

अग्निहोत्रादी कर्म करणारे पुरुष चंद्रलोकास जावून पुन्हा परत येतात व परत येतेवेळी आकाश, वायू, धूम, मेघ इत्यादी पदार्थांचे साम्य प्राप्त होऊन शेवटी व्रीह्यादिकांचे ठिकाणी ते येतात अशी छांदोग्यश्रुती आहे. तेव्हा येथे असा प्रश्न उत्पन्न झाला की अग्निहोत्रादी कर्मे करणारे परत येतेवेळी व्रीह्यादिक योनीशी साम्य पावताना त्या योनीतील दुःख भोगतात किंवा नाही? या प्रश्नाचे उत्तर या सूत्रात दिले आहे.

पूर्वपक्षाने असा कोटिक्रम केला की, अग्निहोत्रादी कर्मात हिंसा होत असल्यामुळे त्या हिंसेमुळे कर्मकर्त्याला दुःख झाले पाहिजे व ते त्यांना व्रीह्यादियोनीत होते. यावर भगवान व्यास म्हणतात :-

वैध हिंसा ही दुःखदायी नाही, म्हणून स्वर्गातून परत येताना व्रीह्यादिक योनीतील दुःख त्यांना भोगावे लागत नाही. म्हणजे याचा भाव असा आहे की, अग्निहोत्रादी कर्मे स्वर्गदायक असून त्यात हिंसा होत असली तरी ती स्वर्गाला प्रतिबंधक नाही किंवा त्याचे दुःख भोगावे लागत नाही. यावरून हे स्पष्ट होते की, स्वर्ग या ध्येयाच्या दृष्टीनेच या सूत्रात वैध हिंसेचा विचार केला आहे. मोक्षाच्या दृष्टीने विचार केलेला नाही. मोक्षाच्या दृष्टीने पाहता आचार्य वैध हिंसेला दोषावह ठरवितातच. पाप दोन प्रकारचे आहे. एक स्वर्गासह मोक्षप्रतिबंधक व दुसरे मोक्ष प्रतिबंधक **''कलंजं न भक्षयेत्''** इत्यादी निषेध स्वर्ग प्रतिबंधक पापाला उत्पन्न करणारे असून वैध हिंसा इत्यादी पापे मोक्षप्रतिबंधक आहेत म्हणूनच,

**धर्मोऽपीह मुमुक्षूणां पापमेवोच्यते ।**

वैध धर्मही मुमुक्षूला पापरूपच आहे.

**ननूर्ध्वरेतसां गृहस्थानां च समाने आश्रमित्वे उर्ध्वरेतसामेवोत्तेरण पथा गमनं, न गृहस्थानामिति न युक्तम् ।**

**अग्निहोत्रादि वैदिककर्म बाहुल्ये च सति ।**

**नैष दोषः । अपूता हि ते ।**

**शत्रुमित्रसंयोगनिमित्तौ हि तेषां रागद्वेषौ ।**

**तथा धर्माधर्मौ हिंसानुग्रहनिमित्तौ ।**

**हिंसानृतमायाब्रह्मचर्यादि च बह्वशुद्धि कारकमपरिहार्यं तेषाम् । अतोऽपूताः ॥**

अग्निहोत्रादी कर्म करणाऱ्याकडून हिंसादी पुष्कळ अशुद्धाचरण होते म्हणून ते शुद्ध पुण्यवान नसतात; व त्यामुळे त्यांना उत्तर मार्गाने ब्रह्मलोकास जाता येत नाही, असे आचार्य म्हणतात व नाथांचेही हेच म्हणणे आहे.

*भक्तांच्या यज्ञाचे स्वरूप*

'भारतांतर्गत वसूच्या यज्ञाविषयी लिहितांना शास्त्रीबोवा म्हणतात, उपरिचराने यज्ञ केला त्यात नारायण स्वतः हविर्भाग घेत असे असे वर्णन आहे. पण नारायणाला कोठेही हविर्भाग सांगितला नाही, म्हणून ही कथा बनावट वाटते.'

उपपत्ती समजली नाही की ते प्रक्षिप्त वगैरे आहे, असे काहीतरी भरमसाठ विधान करावयाचे; ही जी शास्त्रीबोवांचे लेखातून प्रवृत्ती दिसते तिला अनुसरूनच हेही विधान आहे. नारायणाला हविर्भाग सांगितला आहे असे कोणी म्हणत नाही व तेथेही तसा आशय दिसत नाही. या कथेत भक्त कसा यज्ञ करतात, त्यांच्या यज्ञादी क्रिया साक्षात् परमेश्वराला कशा पावतात व त्यामुळे मोक्ष प्राप्तीरूप महालाभ कसा होतो, हे सांगितले आहे. 'जीव कांही सेव्य होऊ शकत नाही.' (ब्र.सू. १-२-२) म्हणून यज्ञादि कर्मात जेथे देवतांचे यजन सांगितले आहे. तेथे देखील देवता ह्या जीव असल्यामुळे वास्तविक त्यांचे यजन सांगितले नसून त्यांच्या द्वारा तदंतर्यामी परमात्म्याचेच यजन सांगितले आहे. विद्यारण्यांनीही -

**यद्यपि इंद्रादयस्तत्राहूयन्ते तथापि परमेश्वरस्यैव इंद्रादिरूपेणावस्थानात् सर्वैरपि परमेश्वर एव हूयते ।**

इंद्रादी देवतांचे द्वारा परमेश्वराचेच यजन सांगितले आहे असे म्हटले आहे. या वेदान्तज्ञानानुसार भगवद्भक्त भगवान् नारायणाला प्रथम सर्व यज्ञद्रव्ये समर्पण करून व तत्प्रीत्यर्थत्वाचा संकल्प करून देवतांचे यजन करतात, देवतांचे यजन होत असतांनाही त्यांचे ईश्वरध्यान सुटत नाही. म्हणून त्यांचे ते सर्व कर्म साक्षात् परमेश्वरालाच पावते. भक्तावाचून इतरांचे कर्म साक्षात् परमेश्वराला पोहचत नाही. उपरिचर भगवद्भक्त होता म्हणून त्याच्या यज्ञात भगवान् इंद्रादिकांच्या द्वारा आहुती न घेता साक्षात् आपण येऊन घेत होता. हा भगवद्भक्तांचा यज्ञविधीच खरा

यज्ञविधी होय. अशा प्रकारच्या आचारात आचार्यांचीही संमती आहे.

**ईश्वरः सर्वज्ञः नारायणाख्यः अहं हि सर्वयज्ञानां श्रौतानां स्मार्तानां च सर्वेषां यज्ञानां देवतात्मत्वेन भोक्ता च प्रभुरेव च ।**

**मत्स्वामिकोहि यज्ञः ।**

**येऽप्यन्यदेवताभक्तास्तेऽपि मामेव यजन्ति अविधिपूर्वकम् अज्ञानपूर्वकं यजन्ति ।**

**मद्याजिनो वैष्णवा मामेव यान्ति ।**

**समानेऽपि आयासे मामेव न भजन्ते अज्ञानात् ।**

**तेन तेऽल्पफलभाजो भवन्ति ।**

भावार्थः- यज्ञद्वारा देवतांचे यजन करण्यात, परमेश्वराचे यजन करण्यात सारखेच श्रम आहेत व भगवंतच सर्व यज्ञाचा भोक्ता व स्वामी आहे. तरी पण हे न जाणता कर्मी लोक देवतांचे यजन करून स्वर्गासारखे नाशिवंत फल प्राप्त करून घेतात.व माझे वैष्णव भक्त माझे यजन करून मोक्षरूपी महत्फल प्राप्त करून घेतात. याप्रमाणे कोणत्याही क्रमाने परमेश्वराचेच भजन करणे हा भक्तियोग नुसत्या देवतात्मक कर्ममार्गापेक्षा श्रेष्ठ आहे. (गी.अ.९.श्लो.२४-२५) व यांत हिंसा इत्यादी अशुद्धि प्रकार आवश्यक नसून त्यांच्या अभावी कोणता प्रत्यवायही उत्पन्न होत नाही. हा भक्तियोगच पुढे पराभक्तीला प्राप्त होतो. हा गौण व पराभक्तीचा मार्ग श्रुती, पुराण, इतिहास, गीता, भागवत, ब्रह्मसूत्र इत्यादिकातून सांगितला असल्यामुळे अवैदिक नाही.

सारांश, मोक्षशास्त्राचे दृष्टीने पाहता वैध हिंसा ही अपूर्व विधिरूप नाही तर उलट मोक्षप्रतिबंधक म्हणजे अधर्मरूप आहे (म्हणूनच) तस्माद्युध्यस्व भारत । या श्लोकावरील टीकेत -

**नहि अत्र युद्धकर्तव्यता विधीयते । युध्यस्व इत्यनुवादमात्रं न विधिः ॥**

असे आचार्यांनी म्हटले आहे. म्हणून वैध हिंसेचे तात्पर्य हिंसेत नसून मोक्षसाधक अहिंसेत आहे, असे श्रुतिस्मृती इत्यादि शास्त्रे व आचार्य यांच्या मताला अनुसरून आम्ही म्हणतो. असो. आपली वर्तमान पत्राची कोणती अडचण न सांगता किंवा दुसऱ्या कोणत्यारीतीने आमची लेखमाला छापण्यास इन्कार न करिता आम्हाला आपले मत जनतेपुढे मांडण्यास संपादकांनी मोठ्या प्रेमाने सवलत दिली याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहो. **'श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय'**